नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २७४ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### 'तृणमूल'चे चिन्ह गोठवले !

मुंबई (स. गांवकरी) : पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे दोन गट पडले आहेत. पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हावरून ममता बॅनर्जी आणि रितब्रता बॅनर्जी यांच्यात वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, पोटनिवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने पक्षाचे मूळ 'जुळी फुले' हे चिन्ह गोठवले आहे. परिणामी, आयोगाने प्रत्येक गटाला स्वतंत्र चिन्हे बहाल केल्यामुळे, आता हे दोन्ही गट नंदीग्राम आणि रेजीनगरमधील निवडणुका वेगवेगळ्या चिन्हांवर लढवतील. विशेष म्हणजे, नंदीग्राम आणि रेजीनगर विधानसभा मतदारसंघांत ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसच्या दोन्ही गटांतील उमेदवारांनी बुधवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. सुरुवातीला त्यांनी तृणमूल काँग्रेसचे नाव आणि 'जुळी फुले' हे चिन्ह वापरून अर्ज दाखल केले होते. मात्र, आयोगाच्या निर्णयानंतर आता दोन्ही गटांचे उमेदवार वेगवेगळ्या चिन्हांवर निवडणूक लढवणार आहेत. ममता बॅनर्जी यांच्या गटाकडून नंदीग्रामसाठी संचिता प्रधान आणि रेजीनगरसाठी रबिउल आलम चौधरी यांना उमेदवार म्हणून रिंगणात उतरवण्यात आले आहे. दुसरीकडे, रितब्रता बॅनर्जी यांच्या गटाचे प्रतिनिधित्व करत मोहम्मद एतेशमुल हक आणि सफिउद्दीन शेख हे अनुक्रमे नंदीग्राम आणि रेजीनगरमधून निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. सुरुवातीला दोन्ही गटांनी पक्षाचे नाव आणि चिन्ह तेच वापरण्याची इच्छा दर्शवली होती.

### अफगाणिस्तानला लोळवलं

मुंबई (स. गांवकरी) : श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने घरच्या मैदानावर अफगाणिस्तानविरुद्धची मालिका ३-० अशी जिंकली आणि आता हा संघ आशियाई क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी जपानला रवाना होणार आहे. त्याचवेळी वेस्ट इंडिजचा संघ भारत दौऱ्यावर आहे. एकामागून एक मालिका भारतीय संघ खेळणार आहे आणि क्रिकेट चाहत्यांसाठी ही मेजवानी असेल. आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष क्रिकेट सामने २४ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान होतील आणि यात भारतीय संघ थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार आहे. भारताला अंतिम फेरीत पाकिस्तानशी दोन हात करण्याची संधी मिळू शकते. याच कालावधीत वेस्ट इंडिजचा संघ भारत दौऱ्यावर तीन वन डे व पाच ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळण्यासाठी येणार आहे.

### सामाईक विहिरीच्या पाण्याच्या वादातून मारहाण

आळेफाटा (स. गांवकरी) :सामाईक विहिरीचे पाणी व पाइपलाइनच्या वादातून नातेवाईकाला लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी बेल्हे येथील बबन लक्ष्मण पिंगट (वय ६७) व देविदास बबन पिंगट (वय ४१) यांना जुन्नर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दोषी ठरवून एक वर्षाच्या साध्या कारावासाची व दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल न्यायदंडाधिकारी नम्रता महादेव बिरादार यांनी १६ सप्टेंबर रोजी दिला. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी सामाईक विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरून झालेल्या वादात आरोपींनी हरिदास नागू पिंगट यांना मारहाण केली होती. बबन पिंगट यांनी गळा पकडून जमिनीवर पाडले, तर देविदास याने लोखंडी खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने पाठीवर व पायावर मारहाण केली होती. याप्रकरणी आळेफाटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता अनुप ल. लखोटीया यांनी सहा साक्षीदार, वैद्यकीय अहवाल व जप्त मुद्देमाल न्यायालयात सादर केला.

# वेगवेगळी चिन्हे देऊ शकला असता

## SC ने निवडणूक आयोगाला सुनावलं

मुंबई : (स. गांवकरी)

शिवसेना निवडणूक चिन्हावरून सुरू असलेला वादावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी नीरज किशन कौल यांनी शिवसेना शिंदे गटाची बाजू मांडली. या युक्तीवादावेळी सर्वोच्च न्यायालयाने ज्यावेळी समोर असलेले सर्व परीक्षण कोणतेही स्पष्ट निर्णय देऊ शकत नसतील तर त्यावेळी निवडणूक आयोग दोन्ही गटाला आरक्षित निवडणूक चिन्ह म्हणजे धनुष्य बाण देण्यास नकार देऊ शकत होतं असा शेरा मारला.



बार अँड बेंचच्या रिपोर्टनुसार, सुनावणीवेळी शिंदे गटाचे वरिष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी निवडणूक आयोगाकडून विधिमंडळ बहुमताचा आधार घेण्याचा बचाव करत होते. त्यावेळी जस्टीस जॉयमाल्या बागची यांनी जर सर्व परीक्षण हे पुरेसे नव्हते त्यावेळी निवडणूक आयोगाकडे दोन्ही गटांपैकी कोणालाही लाभ न देता ते निवडणूक चिन्ह गोठवण्याचा पर्याय होता. त्या दोघांना बाळासाहेब ठाकरेंच्या नावावर नाही तर आपापल्या हिंमतीवर निवडणूक लढण्यास सांगू शकले असते.' असं वक्तव्य केलं. जस्टीस बागची यांनी स्पष्ट केलं की संविधानाच्या दहाव्या शेड्युलनुसार होणारी कारवाई व्यक्तिगत लोकप्रतिनिधींच्या आचरणासोबत जोडली गेली आहे. तर निवडणूक चिन्हाचा वाद हा राजकीय पक्षांशी संबंधित होता. त्यांनी सांगितलं की निवडणूक चिन्हाचे परीक्षण राजकीय पक्षाचे असते. दुसरीकडे आमदाराची अपात्रता विधानसभेत त्याच्या वैयक्तिक कृत्याशी जोडली गेली आहे. निवडणूक चिन्ह परीक्षण हे विधिमंडळ गटासाठी नाही तर राजकीय दलासाठी केले जाते. वरीष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी सांगितलं की निवडणूक आयोगाने शिवसेनेची घटना, संघटनात्मक स्ट्रक्चर आणि दोन्ही गटाला मिळालेले समर्थन यांची तपासणी केली होती. त्यानुसार सद्य परिस्तितीत विधिमंडळ बहूमतच एकमेव चाचणी होती जिथे व्यवहारिक स्वरूपात ती चाचणी करता येऊ शकत होती. कौल यांनी आपल्या युक्तीवादात पक्षाच्या संघटनात्मक स्ट्रक्चरमध्ये नामांकित सदस्य आणि दबाव असलेले होते. ते पक्षाचे कॅडर आणि खरी इच्छा याबाबत आश्वासक असं काही सादर करू शकत नव्हते. पक्षाच्या प्रमुखाकडेच जास्त अधिकार एकवटले होते. अशा परिस्थितीत पक्षाच्या व्यापक कॅडरच्या समर्थनाचे मोजमाप करणे व्यवहारिक नव्हते. निवडून आलेले प्रतिनिधी हे दोन गटात विभागले गेले होते.

# परतीचा पाऊस जोरदार पडून बळीराजाला दिलासा मिळू दे : महसूलमंत्री

पुणे : (स. गांवकरी)



"राज्याच्या अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक जिल्हे आणि तालुके अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे आता परतीचा पाऊस तरी जोरदार पडू दे आणि राज्यातील माझ्या शेतकरी बांधवांना दिलासा मिळू दे," असे साकडे राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी गुरुवारी (ता. १७) गणरायाच्या चरणी घातले. दरवर्षीप्रमाणे बावनकुळे यांनी पुण्यात गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी राज्यातील पावसाची सद्यःस्थिती, मराठा आंदोलन आणि महसूल विभागाच्या 'सेवा संकल्प अभियाना'वर सविस्तर भाष्य केले. हिंदू समाजात गणेशोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व असून दरवर्षीप्रमाणे यंदाही आपण गणरायाच्या दर्शनासाठी आलो असल्याचे ते म्हणाले.

राज्यातील पावसाच्या स्थितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, "राज्यात काही ठिकाणी पाऊस अत्यंत कमी झाला असून, अनेक गावांना दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः याबाबत बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. अनेक तालुक्यांमध्ये अद्याप पाऊस नाही. मात्र, सरकारचे या संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष आहे. जर परतीचा पाऊस चांगला बरसला, तर पावसाची ही मोठी तूट काही प्रमाणात भरून निघेल आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल." मराठा आंदोलनाच्या मागण्यांबाबतही बावनकुळे यांनी यावेळी माहिती दिली. आंदोलकांच्या मागण्यांबाबत शिष्टमंडळाकडून सविस्तर माहिती मिळाली असून, त्यावर सखोल चर्चा झाली आहे. सध्या या विषयावर सरकारच्या पातळीवरही सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे संकेत त्यांनी यावेळी दिले. अमेडिया कंपनीशी संबंधित व्यवहारातील मुद्रांक शुल्काच्या वादाबाबत स्पष्टीकरण देताना बावनकुळे म्हणाले, "या प्रकरणातील अपिले आमच्याकडे आली आहेत. ती आता पुढील कार्यवाहीसाठी संबंधित हस्तांतरण अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आली असून, पुढील प्रक्रियेनुसार यावर निर्णय होईल." पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.

# मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर मनोज जरांगेंनी 90 दिवसांसाठी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच उपोषण स्थगित केलंय, मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. मनोज जरांगे यांनी सरकारला 90 दिवसांची मुदत दिली आहे. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. 58 लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नको...नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. तसंच मुंबईत गेलेल्या 1 लाख 07 हजार समर्थकांनी माघारी यावं असं आवाहन देखील मनोज जरांगेंनी केलं आहे. मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्याचा मला आनंद आहे. मनोज जरांगेंच्या 13 मागण्यांपैकी 12 मागण्या आम्ही मान्य केल्या होत्या. एका मागणीबाबत आम्ही त्यांना कायदेशीर अडचणी सांगितल्या होत्या. त्यामुळे आम्ही ज्या मागण्या मान्य केल्या आहेत, समितीने जे काही आश्वसनं दिली आहेत, ते सर्व आम्ही पूर्ण करु, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मंदार आर्टसच्या गणेशमूर्तींना राज्यभर मानाचे स्थान

उरुळी कांचन : (स. गांवकरी)

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा दृष्टीकोन समोर ठेऊन तसेच राज्य सरकार,सर्वोच्च न्यायालय यांनी जलप्रदूषण तसेच गणेशमूर्तींचे विसर्जनानंतर मूर्ती उघड्या पडून होणारे विडंबन टाळण्यासाठी घालून दिलेला मापदंड लक्षात घेऊन पर्यावरणपूरक तयार केलेल्या या मूर्तींना राजभवन,मुख्यमंत्री वर्षा निवासस्थान,उपमुख्यमंत्री निवासस्थान तसेच मंत्रिमंडळ निवासस्थाने अशा ठिकाणी विराजमान होण्याची संधी उरुळी कांचन (ता.हवेली ) येथील मंदार आर्टस या मूर्ती निर्मिती कारखान्याला मिळाली आहे. गणेश मूर्तीचे नदी विसर्जन,तलावात विसर्जन तसेच विसर्जन स्थळावर विसर्जनानंतर होणारे जलप्रदूषण तसेच मूर्त्या उघड्या पडून बिभस्य विडंबन रोखण्यासाठी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मितीच्या या प्रयत्नांना थेट राजभवन,मुख्यमंत्री वर्षा निवासस्थान तसेच उपमुख्यमंत्री निवासस्थाने मिळून ७० ठिकाणी या गणेश मूर्ती मागणीचे निमंत्रण मिळून मंदार आर्टस मूर्ती निर्मिती कारखान्याला आदराचे स्थान मिळाले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प राज्य सरकारसह या कारखान्यातील मूर्तीकारांनी केला असून पर्यावरणपूरक मूर्त्या तयार करुन त्यांची जनजागृती करण्याची जबाबदारी या मूर्तीकार यांनी केली आहे. मंदारआर्टस कारखान्याचे मूर्तीकार मंदार कुंभार,पर्यावरण प्रेमी डॉ.अक्षय कौठुळे व मूर्तीची जनजागृती बाजारपेठेत व्हावी म्हणून तेजस तरडगावकर यांनी प्रयत्न केला आहे. त्यांच्या या प्रयत्नांना बाजारपेठत प्रतिसाद मिळून थेट राज्यपाल निवासस्थान राजभवन,मुख्यमंत्री निवासस्थान वर्षा व दोन्ही उपमुख्यमंत्री निवासस्थाने तसेच शासकीय निवासस्थानांत या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापणा झाली आहे.

# अनुसूचित जमाती प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण द्या अन्यथा जागा दाखवून देऊ

## परभणीतील महामोर्चात दीपक बोऱ्हाडे सत्ताधाऱ्यांना इशारा



परभणी : (स. गांवकरी)

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देऊ असे आश्वासन भाजपच्या नेत्यांनी दिल्यामुळेच समाजाने भरभरून पाठिंबा दिला म्हणूनच केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता आली. आपण दिलेल्या आश्वासनाचा जर सत्ताधाऱ्यांना विसर पडला असेल तर येणाऱ्या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ असा इशारा धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी येथे दिला. धनगर समाजास अनुसूचित जाती प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीचा लढा न्याय मिळेपर्यंत कायम राहील असेही ते म्हणाले. धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी येथे धनगर समाजाच्या वतीने महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात या महामेळाव्यासाठी प्रचंड गर्दी जमा झाली होती. याप्रसंगी मंचावर खासदार रामराव वडकुते, सुरेश भुमरे, विठ्ठलराव रबदडे, गणेश हाके, रामकिशन रौंदळे, मारोतराव बनसोडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. आपापल्या राजकीय पक्षांचे जोडे बाहेर ठेवून आपण समाजासाठी एकत्र आल्याचे यावेळी उपस्थित सर्वच नेत्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

आरक्षण मिळवण्यासाठी अजूनही वेळ गेलेली नाही त्यामुळे समाजाने सर्व मतभेद विसरून आरक्षण आंदोलनाच्या लढ्यात सर्वशक्तीनिशी एकत्र यावे, आरक्षण आंदोलन मजबूत करावे, या आंदोलनातून समाजाची शक्ती दाखवून देऊन आरक्षणाचा निर्णायक लढा लढावा, असे आवाहन यावेळी आरक्षणाचे नेते बोऱ्हाडे यांनी उपस्थित समाजबांधवांना केले. या महामोर्चासाठी परभणी जिल्ह्यासह राज्याच्या अन्य जिल्ह्यातूनही धनगर समाजबांधव मोठ्या संख्येने परभणीत एकवटले. त्यामुळे शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर समाज बांधवांची मोठी गर्दी जमा झाली होती.

या महामोर्चात बोलताना आंदोलनाचे नेते बोऱ्हाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी नेत्यांनी धनगर समाजास आरक्षण देण्याचे जाहीररित्या सांगितले. त्यामुळे धनगर समाजाने मागील निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मतदान केले. परिणामी केंद्र आणि राज्यात भारतीय जनता पक्ष सत्तेवर आला. आता देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या वचनाला जागून धनगर समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण द्यावे, अन्यथा येत्या निवडणुकीत पक्षाला त्याची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा दिला.

# महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन संकेतस्थळ सुरू

## शेतीतील प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा

मुंबई : (स. गांवकरी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी, महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यासाठी ऑनलाईन संकेतस्थळ सुरू करण्यात आले. पावसाळी अधिवेशनात महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक मंजूर झाले होते. शेतीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना सक्षम करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे, असे प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. महिला शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भरणे यांच्या हस्ते संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.



महाराष्ट्रातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध कल्याणकारी कार्यक्रमांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी २२ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे आणि महिला शेतकऱ्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील महिला शेतकऱ्यांना अधिकृत मान्यता देऊन त्यांना विविध शासकीय योजना, कार्यक्रम, कृषी पतकर्ज, विमा, कृषी निविष्ठा व विस्तार सेवांचा लाभ अधिक सुलभतेने मिळवून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमाच्या अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरणासाठी ऑनलाइन संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

महिला शेतकरी म्हणून मान्यता देताना केवळ जमिनीच्या मालकीच्या निकषावर भर न देता महिलांचा शेती व शेतीशी संबंधित कामांमधील प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. अधिनियमातील "शेतकरी" या व्यापक व्याख्येत पिकांची लागवड, बीजोत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मधुमक्षिकापालन, मत्स्य व्यवसाय, रेशीम उत्पादन, फलोत्पादन, पुष्पोत्पादन, अळंबी लागवड, कृषी – वनीकरण, कंपोस्ट निर्मिती यांसह विविध कृषी व शेतपूरक कामांचा समावेश आहे. भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर, रोपमळा मजूर व पशुचारक महिलांचाही समावेश करण्यात आला आहे. ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि शेती व्यवसायात कार्यरत असलेल्या सर्व महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी पात्र आहेत.



# जिल्हा बॅंकेत सोलेपाटील दाम्पत्यांच्याहस्ते श्री गणेश पूजा व आरती उत्साहात संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

आज दि. १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत श्री गणरायाची पूजा व आरती भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाली. या पावन प्रसंगी बँकेचे जनसंपर्क अधिकारी तथा जिल्हा देखरेख सहकारी संस्थेचे CEO श्री. भारत सोलेपाटील आणि अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट को-ऑप. बोर्डाच्या चेअरमन तथा पश्चिम महाराष्ट्र सहकारी मंडळाच्या संचालिका सौ. जयमाला सोलेपाटील यांच्या शुभहस्ते श्री गणरायाचे विधिवत पूजन व आरती करण्यात आली. पुरोहितांच्या मंत्रघोषात व मंगलमय वातावरणात संपन्न झालेल्या या पूजाविधीने बँकेच्या परिसरात भक्ती आणि प्रसन्नतेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी श्री गणरायाच्या चरणी बँकेची उत्तरोत्तर प्रगती, तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आरोग्य, सुख, शांती, समृद्धी आणि यश लाभावे, यासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगी बँकेचे CEO मा. श्री. रावसाहेब वर्पे साहेब यांच्यासह बँकेतील वरिष्ठ अधिकारी, अधिकारीवर्ग व सेवकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. श्री गणरायाच्या आशीर्वादाने बँकेच्या प्रगतीचा व समृद्धीचा मार्ग सदैव प्रशस्त होवो, हीच श्रीचरणी प्रार्थना करण्यात आली.

# पारगावच्या कर्तृत्वाचा मोरया प्रतिष्ठानतर्फे गौरव

## विविध क्षेत्रांतील नऊ व्यक्तिमत्त्वांचा सन्मान; मोरया प्रतिष्ठानच्या विधायक उपक्रमाचे कौतुक

आळेफाटा : (स. गांवकरी)



स्मार्ट व्हिलेज पारगावमधील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सारंग शिवाजीराव चव्हाण, अंकिता संतोष बोऱ्हाडे, डॉ. किरण दशरथ रसाळ, वैभव हरिश्चंद्र विश्वे, शमिरा इब्राहिम पटेल, सुभाष पांडुरंग चव्हाण सर, अक्षय रमेश चव्हाण, पै. विशाखा बाबाजी चव्हाण आणि सागर भास्कर चव्हाण या नऊ व्यक्तिमत्त्वांचा मोरया प्रतिष्ठान नेहरमाळा (पारगाव) सार्वजनिक गणेशोत्सव समितीतर्फे आयोजित भव्य सन्मान सोहळ्यात गौरव करण्यात आला.

यामध्ये सारंग चव्हाण (सहायक पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई), अंकिता बोऱ्हाडे (कक्ष अधिकारी, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई), डॉ. किरण रसाळ (वरिष्ठ शास्त्रज्ञ, ICAR–केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्था, मुंबई), वैभव विश्वे (तालुका कृषी अधिकारी, राजगुरुनगर, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन), शमिरा पटेल (कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, आदिवासी विकास विभाग, रायगड), सुभाष चव्हाण सर (आदर्श शिक्षक), अक्षय चव्हाण (पर्यवेक्षक, Technical Operations–Printing, चलन नोट प्रेस, नाशिक), पै. विशाखा चव्हाण (राष्ट्रीय कुस्तीपटू) आणि सागर चव्हाण (आपत्ती व्यवस्थापन व वन्यजीव बचाव कार्यातील प्रशिक्षित आपदा मित्र) यांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व मानाची शाल देऊन गौरव करण्यात आला. मोरया प्रतिष्ठानच्या सार्वजनिक गणेशोत्सव उपक्रमाला यंदा २२ वर्षे पूर्ण झाली. धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व विधायक उपक्रमांची परंपरा जपत पारगावातील विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाचा सन्मान, नव्या पिढीला प्रेरणा आणि गुणवंतांच्या अनुभवातून गावाच्या विकासाला दिशा देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. नेहरमाळा येथील मोरया प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव स्थळी झालेल्या कार्यक्रमाचे शुभहस्ते माजी आमदार अतुलशेठ बेनके यांच्या हस्ते झाले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक माऊली खंडागळे, पंचायत समितीचे गटनेते व सदस्य संभाजीशेठ शिवाजीराव चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण महादेव सपांगे, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष चंदाताई गाडगे, संतोषशेठ येवले, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक सूर्यकांत विरणक, डी. डी. पाबळे, मास्टर ट्रेनर बाबाजी प्रभाकर बांगर, महाराष्ट्र पोलीसचे सचिन सोपान बोंबे, प्रवीण यादव व महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य नवले सर उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत सरपंच सौ. रेशमाताई विकास बोटकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाबाजी मारुती डुकरे, उपसरपंच रामचंद्र रंगनाथ डुकरे, पोलीस पाटील हेमंत सिताराम चव्हाण, व्हा. चेअरमन हरिश्चंद्र मारुती विश्वे आणि सामाजिक कार्यकर्ते शांतारामशेठ डुकरे उपस्थित होते.

माजी आमदार अतुलशेठ बेनके यांनी गणेशोत्सवाबरोबरच मंडळांनी अशा विधायक उपक्रमांचे आयोजन करावे, असे मत व्यक्त केले. संभाजीशेठ शिवाजीराव चव्हाण यांनी पारगावच्या विकासप्रवासातील विविध योगदानाचा उल्लेख केला.

दरम्यान, मोरया प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अक्षय सोनवणे आणि गेल्या ९ वर्षांपासून प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक व कृषी क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त विकास हरिभाऊ चव्हाण यांचा प्रतिष्ठानच्या कार्यातील योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

उपस्थित सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांचाही प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्थापक अध्यक्ष अक्षय सोनवणे यांनी केले, तर आभार कार्याध्यक्ष विकास हरिभाऊ चव्हाण यांनी मानले. आभारप्रदर्शनात त्यांनी दिवंगत अजितदादा पवार तसेच नुकत्याच निधन झालेल्या माजी जिल्हा परिषद सदस्या व माजी गटनेत्या आशाताई बुचके यांच्या स्मृतींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोरया प्रतिष्ठानचे आजी-माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून सोहळा उत्साहात पार पडला. मोरया प्रतिष्ठानच्या या विधायक उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शालेय स्तरावरील कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; २५ शाळांचा सहभाग

मंचर (स. गांवकरी) : शालेय जीवनात खेळांना अनन्यसाधारण महत्त्व असून, विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी लहान वयापासूनच खेळांची आवड निर्माण होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने शालेय स्तरावर कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या स्पर्धेत तब्बल २५ शाळांनी सहभाग नोंदविला आहे. मुलं आणि मुलींसाठी विविध वयोगट तसेच वजनगटांनुसार कुस्तीच्या लढती घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास, शारीरिक क्षमता आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित व्हावी, हा स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. “शालेय स्तरावरूनच चांगले खेळाडू घडविण्यासाठी अशा स्पर्धांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास भविष्यात ते तालुका, जिल्हा, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात,” असे तालुका क्रीडा अधिकारी शोभा पालवे यांनी सांगितले.

### राघोजी भांगरे संघर्ष समिती रावेर तालुका कार्यकारिणी जाहीर

रावेर (स. गांवकरी) : तालुक्यातील खिर्डी येथिल प्रितिकेश दादा मंगल कार्यालय वाघाडी फाटा येथे आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे संघर्ष समितीची तालुका स्तरावर कार्यकारिणी जाहीर झाली. या कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर तालुका रावेर अध्यक्ष श्री मनोहर भाऊ कोळी व सचिव योगेश्वर कोळी यांनी केले. यामध्ये जमातीला आपले जातीचे प्रमाणपत्र सुलभ व सोप्या पद्धतीने कसे मिळतील या विषयी सखोल असे मार्गदर्शन मदनदादा शिरसाट मुख्य मार्गदर्शक, भिका भाऊ सोनवणे प्रदेश उपाध्यक्ष, पंडित जोहरे जिल्हा अध्यक्ष, राज पाटील युवा जिल्हाध्यक्ष, महेंद्र सपकाळे यावल ता. संघटक, महेश कोळी जिल्हा प्रसिद्ध प्रमुख, ब्रिजलाल कोळी, चंद्रकांत तायडे जेष्ठ पत्रकार, विनोद कोळी शिवा भाईजी, मधुकर तायडे यांनी केले. या कार्यक्रमाला रावेर तालुक्यातील असंख्य जमात बांधव यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन घेतले.

### आश्रम शाळेतील शिक्षकाने रंगीत खडू ने काढले नरेंद्र मोदी यांचे चित्र



अक्कलकोट (स. गांवकरी) : काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 76 वा वाढदिवस देशभरात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. अक्कलकोट तालुक्यांत ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 76 व्या वाढदिवसानिमित जागोजागी भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. येथून जवळच असलेल्या कोन्हाळी येथील आश्रम शाळेतील संतोष जकापुरे सर या शिक्षकाने चक्क वेगवेगळ्या रंगीत खडू च्या सहायाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे चित्र रेखाटले होते. कोन्हाळी आश्रम शाळेतील कलाशिक्षक श्री.संतोष जकापूरे सर यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 76 व्या वाढदिवसानिमित्त फळ्यावर रंगीत खडूच्या साहाय्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चित्राचे रेखाटन केले. रंगीत खडूच्या साहाय्याने जकापुरे सर यांनी अतिशय सुंदर आणि सुबक असे पंतप्रधान .नरेंद्र मोदी यांचे चित्र रेखाटले हे चित्र पाहण्यासाठी दिवसभर आश्रम शाळेत गर्दी झाली होती.

### फेरीवाला मुक्त दिवा शहर करण्याचे नवनियुक्त सहायक आयुक्तांना आवाहन



ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा शहरात दिवसेंदिवस बेकायदेशीर फेरीवाल्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार रेल्वे स्थानक परिसराच्या १५० मीटर क्षेत्रात फेरीवाल्यांना सक्त मनाई असल्यामुळे मुंबई शहरातील सर्व रेल्वे स्थानक परिसरात धडक कारवाई करण्यात आली परंतू ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा रेल्वे स्थानक परिसरात रात्रंदिवस अनधिकृत फेरीवाले आपले बस्तान मांडून बसल्याचे पाहायला मिळत आहे. या अनधिकृत अतिक्रमणामुळे दिवेकर नागरिक पुरते हैराण झाले आहेत. रेल्वे स्थानक परिसरातील नेहमीची खोळंबलेली वाहतूक, वाहतूक कोंडीमुळे रेल्वे सेवेला देखील सतत फटका पडत असून दिव्यातील पदपथ व रस्ते फेरीवाल्यांनी गिळंकृत केले आहे. ठाणे महानगरपालिका प्रशासनास गेली अनेक वर्षांपासून विविध राजकीय पक्षांनी शेकडो निवेदने देऊन देखील बेकायदेशीर फेरीवाले हटविण्यास अपयश आले आहे. परिणामी रस्त्यावरून चालताना दिवेकरांना कसरत करत मार्ग काढावा लागत आहे. रोजच्या या मनस्तापाला दिवेकर कंटाळले असून ठाणे पालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सदर गंभीर समस्येची दखल दिवा प्रभाग समितीचे नवनियुक्त सहायक आयुक्त प्रविणकुमार फड कसे घेणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. नुकताच दिवा शहराचा आयुक्तांनी दौरा केला असता शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी फेरीवाला मुक्त दिवा शहराचा तातडीने निर्णय घ्यावा असे स्पष्ट केले होते. दिवा प्रभाग समितीचे नवनियुक्त सहाय्यक आयुक्त प्रवीणकुमार फड 'फेरीवाला मुक्त दिवा शहर व दिव्यातील रस्त्यावर रोज भरणाऱ्या बेकायदेशीर आठवडी बाजारावर काय कारवाई करणार ? दिवा स्थानक परिसर खरोखरच मोकळा श्वास घेणार का ? याकडे सर्व दिवेकरांचे लक्ष लागले आहे.

### आरोपांना ठोस पुराव्याचा आधार नसल्याचे न्यायालयीन सुनावणीत स्पष्ट

कळवण (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील चिचपाडा परिसरात सन २०१८ मध्ये घडलेल्या अल्पवयीन मुलाच्याआत्महत्येप्रकरणी गावातील पंच मंडळींवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालामुळे तब्बल काही वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकरणाला न्यायालयीन पातळीवर पूर्णविराम मिळाला आहे. या प्रकरणात फिर्यादी मनोहर पांडुरंग ठाकरे यांच्या फिर्यादीवरून सोनू अंबू गांगुडे, काळू रामा ठाकरे, हिरामण सोनू वाघ यांच्यासह संबंधित पंच मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित सर्व आरोपी कळवण तालुक्यातील चिचपाडा परिसरातील रहिवासी असल्याचे कागदपत्रात नमूद आहे. गावातील एका घटनेच्या पार्श्वभूमीवर मृत मुलाचा मित्र याला मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा गणेश पोपट ठाकरे याच्यावरही दबाव निर्माण करण्यात आल्याचाआरोप करण्यातआला होता. त्याच्यावर दंड आकारण्यातआल्याचे तसेच त्याला मारहाण केली जाईलआणि शाळेतून काढून टाकले जाईल,अशा दबावामुळे त्याने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीकडून करण्यातआला होता. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार,दि.२६ सप्टेंबर २०१८ रोजी गणेश ठाकरे याने शेतातीलआंब्याच्या झाडाला गळफास घेऊनआत्महत्या केली.

## सुशीलकुमार शिंदे यांच्या नातवाने लावले शुभेच्छा देणारे बॅनर

सोलापूर : (स. गांवकरी)

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस यंदाच्या वर्षी अतिशय उत्साहात आणि सामाजिक उपक्रमांनी साजरा होत आहे. सोलापुरात सुद्धा प्रशासकीय पातळीवर वाढदिवसानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तसेच कार्यकर्त्यांच्या वतीने सुद्धा मोठ्या प्रमाणात सामाजिक उपक्रम घेतले जात आहेत. सोलापुरात एक पोस्टर मात्र सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे ते म्हणजे माजी केंद्रीय गृहमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शिखर पहारिया यांचे. यापूर्वी शेखर पहारिया यांनी सोलापुरात अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत त्यांच्या उपक्रमांची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. ज्यांच्यात सुशीलकुमार शिंदे यांची झलक पाहायला मिळते. अशा शिखर पहारिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी




यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाचे सोलापूर शहरात बऱ्याच ठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत ते सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. 2024 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी शिखर पहारीया यांचे सोलापूर शहर मध्य या मतदारसंघातून काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीची चर्चा झाली परंतु नंतर त्यावर पूर्णविराम देण्यात आला. पण काँग्रेसच्या नेत्याच्या नातवानेच थेट भाजपचे ज्येष्ठ नेते, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा दिल्याने आता यावरून नवल व्यक्त होत आहे.

## आव्हानात्मक शस्त्रक्रियेतून वैद्यकीय नवोपक्रम

### रोटेटर कफ रिपेअर उपकरणासाठी डॉ. बनर्जी यांना भारतीय पेटंट

पुणे : (स. गांवकरी)



एका आव्हानात्मक शस्त्रक्रियेदरम्यान आलेल्या अडचणीचे स्वदेशी वैद्यकीय नवोपक्रमात रूपांतर करत, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू येथील ॲडिशनल डायरेक्टर – ऑर्थोपेडिक्स डॉ. बनर्जी बी.एच. यांना त्यांच्या 'Apparatus for Trans-Osseous Rotator Cuff Repair' या आविष्कारासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून भारतीय पेटंट प्रदान करण्यात आले आहे. या उपकरणाच्या मदतीने पारंपरिक स्यूचर अँकरचा वापर न करता, हाडामध्ये तयार केलेल्या टनेलच्या माध्यमातून फाटलेला टेंडन पुन्हा हाडाशी जोडण्यास मदत होते. विशेषतः हाडांची गुणवत्ता कमी असलेल्या वृद्ध तसेच ऑस्टिओपोरोसिसग्रस्त रुग्णांच्या उपचारात ही पद्धत उपयुक्त ठरू शकते. या नवोपक्रमाची संकल्पना एका रुग्णाच्या रोटेटर कफ रिपेअर शस्त्रक्रियेदरम्यान सुचली. शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाच्या हाडांची गुणवत्ता कमी असल्याने पारंपरिक अँकरला अपेक्षित पकड मिळत नसल्याचे डॉ. बनर्जी यांच्या निदर्शनास आले. रिपेअरच्या गुणवत्तेशी तडजोड करण्याऐवजी त्यांनी टेंडनला थेट हाडामधून जोडण्याच्या पर्यायी पद्धतीचा विचार सुरू केला. या पद्धतीचा यशस्वी अनुभव मिळाल्यानंतर ट्रान्स-ओसियस रोटेटर कफ रिपेअर सुलभ करण्यासाठी विशेष उपकरण विकसित करण्याची प्रेरणा डॉ. बनर्जी यांना मिळाली. सुमारे तीन ते चार वर्षांच्या कालावधीत या उपकरणाचा विकास, चाचण्या आणि आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. आर्थ्रोस्कोपिक पद्धतीने करण्यात येणाऱ्या या तंत्रामध्ये हाडामध्ये टनेल तयार करून त्यातून स्यूचर पास केला जातो. त्यानंतर फाटलेल्या टेंडनला पुन्हा हाडाशी जोडले जाते. या पद्धतीमुळे पारंपरिक अँकरवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. तसेच काही रुग्णांमध्ये उपचाराचा खर्च आणि इम्प्लांटशी संबंधित संभाव्य गुंतागुंत कमी होण्याची शक्यता आहे. सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरूचे ॲडिशनल डायरेक्टर – ऑर्थोपेडिक्स आणि या उपकरणाचे आविष्कारक डॉ. बनर्जी बी.एच. म्हणाले, “या नवोपक्रमाची कल्पना एका आव्हानात्मक रोटेटर कफ रिपेअर शस्त्रक्रियेदरम्यान सुचली. रुग्णाच्या हाडांची गुणवत्ता कमकुवत असल्याने पारंपरिक अँकर फिक्सेशन करणे आव्हानात्मक ठरत होते. रिपेअरच्या गुणवत्तेशी तडजोड करण्याऐवजी टेंडनला हाडामधून सुरक्षितपणे जोडण्याची शक्यता तपासण्याचा मी निर्णय घेतला. या अनुभवातून ही पद्धत अधिक सुलभ करणारे उपकरण विकसित आणि परिष्कृत करण्याची प्रेरणा मिळाली.”

## खिर्डी बु. येथे घरफोडीचे सत्र सुरूच

- मागील दोन महिन्यांत दोन घरफोड्यांनंतर पुन्हा चोरी
- आरोपींचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर आव्हान !

रावेर : (स. गांवकरी)



तालुक्यातील खिर्डी बुद्रुक येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा तब्बल ३ लाख २२ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शहनाज शेख अखतर (वय ४२, व्यवसाय गृहिणी, रा. खिर्डी बु., ता. रावेर) यांच्या फिर्यादीवरून निंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १८६/२०२६ अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजेपासून १४ सप्टेंबर रोजी दुपारी १.५० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू तसेच रोख रक्कम चोरून नेली. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचा हार, सोन्याची पोत तसेच चांदीच्या दोन छन्न्या यांचा समावेश आहे. एकूण २५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ४०० ग्रॅम चांदीचे दागिने चोरीस गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. चोरट्यांनी ओम साई राम बचत गटाच्या भरणा रकमेसह ५४ हजार रुपये तसेच अन्य ३५ हजार रुपये, अशी एकूण ८९ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम मिळून ३ लाख २२ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे.

खिर्डी परिसरात मागील दोन महिन्यांत दोन घरफोडीच्या घटना घडल्याचा स्थानिकांचा दावा आहे. या घटनांमध्ये आरोपींचा शोध अद्याप लागलेला नसल्याने आता पुन्हा घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रात्रीची पोलिस गस्त वाढवावी, संशयितांची चौकशी करावी आणि घरफोडीच्या मागील घटनांचा तपास गतीने पूर्ण करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या घटनेमुळे खिर्डी परिसरात खळबळ उडाली असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेणे आणि चोरीच्या घटनांना आळा घालणे हे निंभोरा पोलिसांसमोर पुन्हा एकदा आव्हान ठरले आहे. सदर घटनेचा पुढील तपास निंभोरा पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अभय ढाकणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल रिजवान पिंजारी करीत आहेत.

## साधे, स्वस्त आणि उपयुक्त प्रवासाचे साधन पुन्हा रुळावर

डांग-गुजरात : (स. गांवकरी)



- नॅरोगेज ट्रेन सेवा सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण
- मुसळधार पावसामुळे वाहून गेलेल्या रेल्वे ट्रॅकची दुरुस्ती पूर्ण
- ट्रेन सेवा पुन्हा सुरू झाल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि सामान्य प्रवाशांना मोठा दिलासा.

दक्षिण गुजरातमध्ये सुमारे महिनाभरापूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे रेल्वे ट्रॅकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने बिलिमोराहून वघईकडे जाणारी नॅरोगेज ट्रेन सेवा बंद करण्यात आली होती. ट्रेन सेवा बंद झाल्यामुळे वघई, उनाई तीर्थक्षेत्र तसेच अनावळ, रानकुवा, धुळीकुवा, चिखली रोड यांसह परिसरातील नोकरी, व्यवसाय आणि इतर कामांसाठी सुरत तसेच वलसाडच्या दिशेने दररोज प्रवास करणाऱ्या नोकरदार व सामान्य प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.पावसाची परिस्थिती सामान्य झाल्यानंतर वलसाड रेल्वे प्रशासनाकडून वाहून गेलेल्या रेल्वे ट्रॅकच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. दोन दिवसांपूर्वी नॅरोगेज रेल्वे ट्रॅकची आवश्यक दुरुस्ती पूर्ण करण्यात आली. त्यानंतर रेल्वे प्रशासनाने इंजिन चालवून ट्रॅकची फिटनेस चाचणीही घेतली.

## मिरवणुकीत कायमस्वरूपी डीजे डॉल्बी व लेझर लाईट बंद करा



सोलापूर : (स. गांवकरी)

गणेशोत्सवात डीजे डॉल्बी आणि मानवी डोळ्यांना घातक असणाऱ्या लेझर लाईट्सवर सोलापूर जिल्हा व पोलिस प्रशासनाने केलेल्या बंदीचे पोलीस मित्र सोशल फौंडेशन कौतुक व स्वागत करत असून हा नियम केवळ एका सणा पुरता मर्यादित न ठेवता वर्षभर कायमस्वरूपी लागू करावा या मागणी साठी पोलीस मित्र सोशल फौंडेशन ने सोलापूर चे जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाच्या तालावर आजची तरुण मुले व्यसनाधीनतेच्या आहारी जात असून काही तरुण मुले डीजेच्या तालावर मद्यधुंद अवस्थेत नाचताना दिसत आहेत डीजेच्या आवाजा मुळे काही लोकांना कायमचे बहिरेपण आलेले आहे

## जीवघेण्या खड्ड्यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

नवी मुंबई : (स. गांवकरी)



एमआयडीसी सेंट्रल रोडवरील हायको बसस्टॉपच्या बाजूला सर्व्हिस रोडवर तब्बल तीन ते चार मीटरचा जीवघेणा खड्डा गेल्या अनेक दिवसांपासून जैसे थे स्थितीत आहे. या खड्ड्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. प्रशासनाने तातडीने या ठिकाणी कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, याच रस्त्यावर काही दिवसांपूर्वी स्पीड ब्रेकरमुळे एक डम्पर पलटी झाला होता. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही; मात्र मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. दरम्यान, या धोकादायक खड्ड्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना फोनद्वारे माहिती देण्यात आली असून, खड्ड्याचे छायाचित्रेही पाठविण्यात आली आहेत. तरीदेखील अद्याप ठोस आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तक्रारींवर उडवाउडवीची उत्तरे देऊन थातुरमातुर स्वरूपाची कारवाई केली जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, येत्या काही दिवसांत या जीवघेण्या खड्ड्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आली नाही, तर संबंधित जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदाराची जबाबदारी सार्वजनिकपणे निश्चित करण्यासाठी त्यांच्या पदाचे नाव, अधिकृत नाव आणि उपलब्ध अधिकृत छायाचित्रासह त्या ठिकाणी निषेधात्मक महापूजा आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाचा उद्देश कोणाचाही वैयक्तिक अपमान करणे नसून, नागरिकांच्या जीविताची सुरक्षितता आणि प्रशासनाची जबाबदारी निश्चित करणे हा असल्याचे विष्णू बुरे यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने अपघाताची वाट न पाहता तातडीने खड्डा बुजवून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे. अपघात झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वी प्रशासन जागे होणार का? नागरिकांच्या जीवाची जबाबदारी नेमकी कोणाची? हा सवाल आता उपस्थित झाला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे




## हिमायतनगर येथे ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

हिमायतनगर (स. गांवकरी) : हिमायतनगर येथील नगरपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळीच ध्वजारोहण सोहळ्याच्या सुरुवातीला मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रणेते, पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन व पूजन करण्यात आले. यानंतर नगराध्यक्ष शेख रफिक शेख महेबूब यांच्या शुभहस्ते मुख्य ध्वजारोहण सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. या प्रसंगी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी समाधान मासाळ, उपनगराध्यक्ष विनोद गुंडेवार, सर्व नगरसेवक, सेविका प्रतिनिधी, हिमायतनगर शहरातील प्रतिष्ठित नागरिक, नगरपंचायतीचे सर्व कर्मचारी, जिल्हा परिषद कन्या शाळेच्या विद्यार्थिनी, शिक्षक वृंद,माजी नगरसेवक तसेच पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीताच्या तालावर तिरंग्याला मानाचा मुजरा केला. मुख्य सोहळा पार पडल्यानंतर नगरपंचायत कार्यालयात सर्व उपस्थितांनी एकत्रित येऊन 'स्वच्छता शपथ' घेतली. हिमायतनगर शहर स्वच्छ, सुंदर, आरोग्यदायी ठेवण्यासोबतच नियमित श्रमदान करण्याचा दृढ संकल्प सर्व उपस्थितांनी या वेळी केला. जिल्हा परिषद कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम आणि ढोल ताशा च्या माध्यमातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

अर्धापूर (स. गांवकरी) : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून अर्धापूर पोलीस ठाण्याच्या वतीने दि.१७ गुरुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या भावनेतून अनेक रक्तदात्यांनी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून रक्तदान केले. अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर पार पडले. यावेळी सपोनि.भास्कर कांबळे,उपनिरीक्षक सुरेश भोसले,पोउनि.अनिता राठोड व भिमराव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पोलीस पाटील अवधूत क्षीरसागर,आनंदराव इंगळे, सचिन दिलमाडे आणि शिवाजी चव्हाण यांनीही या कार्यक्रमास हजेरी लावत महिला पोलीस कर्मचारी इंदू गवळी,पोलीस पाटील सचिन देलमाडे सह अनेकांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी जमादार एस.के.ढवळे,संभाजी शिवभक्त,महेंद्र डांगे,इंदु गवळी,प्रदीप जमदाडे,हेमंत बिचकुले,सुभाष मुंगल आदींनी विशेष परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमाबद्दल पोलीस प्रशासनाचे परिसरातून कौतुक होत आहे.




## सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन

ठाणे (स. गांवकरी) : जिल्हा परिषद, ठाणेच्या सभागृहात आज, दि. १७ सप्टेंबर, २०२६ रोजी 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. शासनाच्या विविध योजना व सेवा अधिक प्रभावीपणे ग्रामस्थांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देणे आणि पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विभागांमध्ये समन्वय वाढविणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी 'सेवा संकल्प अभियानास' जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "हे अभियान प्रभावी आणि यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रत्येक विभागाने सक्रिय सहभाग नोंदवावा. शासकीय योजना व सेवांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना आवश्यक सेवा व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत." मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' देखील राबविण्यात येत असल्याचे नमूद केले. या अभियानासह 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत शासकीय सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

## गौराईचे उत्साहात आगमन; महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरात गणेशोत्सवाच्या उत्साहात गुरुवारी (ता. १७) विविध ठिकाणी गौराईचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. घराघरांत महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौराईचे स्वागत करून विधिवत पूजा-अर्चा केली. गौराईच्या आगमनानिमित्त घरांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. गौराईच्या स्वागतासाठी महिलांनी सकाळपासूनच घरांची स्वच्छता करून विविध प्रकारच्या आकर्षक रांगोळ्या काढल्या. फुलांच्या माळा, तोरणे तसेच विद्युत रोषणाईने घरांचा परिसर सजविण्यात आला होता. गौराईला साडी, दागिने व पारंपरिक अलंकारांनी सजवून तिची विधिवत पूजा करण्यात आली. गौराईच्या आगमनामुळे परिसरातील वातावरण भक्तिमय झाले असून महिला व मुलींमध्ये विशेष उत्साह दिसून आला. अनेक कुटुंबांमध्ये नातेवाईक व पाहुण्यांचे आगमन झाले आहे. गौराईच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने विविध पदार्थ तयार करून नैवेद्य दाखविण्यात आला. गौराईच्या पूजनानंतर महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवाबरोबरच गौराईच्या आगमनामुळे परिसरातील सणाचा उत्साह आणखी वाढला आहे. गौरी पूजनाचा मुख्य दिवस तसेच त्यानंतरच्या धार्मिक विधींमुळे शुक्रवारी सकाळीही गौरी पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी होण्याची शक्यता आहे. गौरींच्या हारांना मोठी मागणी असल्याने त्यांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. एरव्ही ३० रुपयांना मिळणारा हार गुरुवारपासून १०० ते १२० रुपयांना विकला जात होता. त्यामुळे गौरी पूजेच्या साहित्याच्या खर्चात वाढ झाली आहे. शुक्रवार : मुख्य पूजन — सकाळी गौराईंची आरती, १६ भाज्यांसह पुरणपोळीचा नैवेद्य, हळदी-कुंकू, ओटी भरणे तसेच घरगुती धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. शनिवार : विसर्जन — सकाळी दहीभाताचा नैवेद्य, आरती, दोरा घेण्याचा कार्यक्रम, हळदी-कुंकू आदी धार्मिक विधी झाल्यानंतर गौराईंचे विसर्जन करण्यात येणार आहे.

# स्वच्छ, सुंदर आणि कचरामुक्त नांदेडसाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

## पालकमंत्री अतुल सावे : 'स्वच्छ नांदेड – सुंदर नांदेड' मोहिमेचा शुभारंभ; आगामी सण-उत्सव स्वच्छ वातावरणात साजरे करण्याचे आवाहन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड शहर हे मराठवाड्यातील महत्त्वाचे शहर असून, शहराला महाराष्ट्रातील आदर्श आणि सुंदर शहर बनविण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येकाने आपल्या घरासोबतच परिसरही स्वच्छ ठेवावा, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.




मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर व्हीआयपी रोडवरील शहीद जवान स्मारक परिसरात आयोजित विशेष कार्यक्रमात पालकमंत्री अतुल सावे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता करत व भिंतीवर पेंटींग करत 'स्वच्छ नांदेड – सुंदर नांदेड' या मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, आमदार अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती वीरेंद्रसिंग गाडीवाले, सभागृह नेते महेश कनकदंडे, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, किशोर स्वामी, विविध प्रभागांतील नगरसेवक, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार अशोक चव्हाण यांनी आगामी सण-उत्सवांचे स्वागत स्वच्छ आणि सुंदर नांदेडमध्ये करूया, असे आवाहन केले. स्वच्छतेची ही मोहीम केवळ एक दिवसापुरती मर्यादित न राहता ती लोकचळवळ बनावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नांदेड शहर स्वच्छ, सुंदर आणि पूर्णपणे कचरामुक्त करण्याच्या उद्देशाने महानगरपालिका प्रशासनामार्फत 'स्वच्छ नांदेड – सुंदर नांदेड' ही व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष सेवा संकल्प अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत गल्ल्या, वस्त्या आणि चौकांची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे.

शहर संपूर्णपणे कचरामुक्त करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. प्रमुख रस्ते आणि दुभाजकांची विशेष स्वच्छता, सार्वजनिक भिंतींची रंगरंगोटी, दुभाजकांवरील झाडांची छाटणी आणि परिसराचे सुशोभीकरण यावर भर देण्यात येणार आहे. आगामी श्री गणेशोत्सव आणि दुर्गादेवी उत्सवाच्या काळात नांदेड शहरात भाविकांची मोठी गर्दी होते. हे लक्षात घेऊन सर्व प्रमुख धार्मिक स्थळे, मंदिर परिसर, विसर्जन मार्ग आणि उत्सव मार्गांवर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

या ठिकाणी चोवीस तास स्वच्छता आणि कचरा संकलनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. स्वच्छ नांदेड – सुंदर नांदेड ही मोहीम यशस्वी करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने स्वयंसेवी संस्था, गणेश मंडळे, युवक, विद्यार्थी आणि नागरिकांना सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. शहरातील स्वच्छता कायम राखण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले.

# घरकुल लाभार्थ्यांच्या घरी दिवा प्रज्वलित



ठाणे : (स. गांवकरी)

ग्रामस्थांना विविध शासकीय योजना व सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देणे, गावाच्या सर्वांगीण विकासाला गती देणे आणि नागरिकांचा शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने 'स्वच्छता ही सेवा', 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' आणि 'सेवा संकल्प अभियान' यांचा संयुक्त प्रारंभ आज भिवंडी तालुक्यातील डोहळे ग्रामपंचायतीत करण्यात आला. ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (आय.ए.एस.) यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, गटविकास अधिकारी भिवंडी गोविंद खामकर तसेच पंचायत समिती व विविध विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी गावाच्या विकासासाठी प्रशासनासोबत ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

# नरेंद्र पवार यांच्यासह बडतर्फ पोलीस कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

- शस्त्राचा धाक दाखवून मद्य पाजून अत्याचार केल्याचा तरुणीचा आरोप
- ४८ तासांत अटक न झाल्यास आंदोलनाचा काँग्रेस गटनेत्या कांचन कुलकर्णी यांचा इशारा



भिवंडी : (स. गांवकरी)

भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि त्यांचे सहकारी तथा बडतर्फ पोलीस कर्मचारी शैलेश पाटील यांच्याविरोधात तरुणीवर सामूहिक अत्याचार केल्याच्या आरोपावरून भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. संबंधित तरुणीने दिलेल्या तक्रारीत शस्त्राचा धाक दाखवून मद्य पाजल्यानंतर अत्याचार केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पडघा पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणीचा तिच्या पतीसोबत वाद सुरू होता. या वादासंदर्भात बोलायचे असल्याचे सांगून तिला बापगावच्या दिशेने नेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. नरेंद्र पवार यांनी तरुणीला कारमध्ये बसण्यास सांगितले. कारचालक शैलेश पाटील हा आपला मित्र असल्याचे सांगून आपण थोडे लांब जाऊ, येथे मला लोक ओळखतात, असे सांगण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

यानंतर बापगाव येथील शैलेश पाटील यांच्या घरातून काही कागदपत्रे आणायची असल्याचे सांगून तरुणीला एका फार्महाऊसवर नेण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तेथे शस्त्राचा धाक दाखवून मद्य पाजण्यात आले आणि त्यानंतर दोघांनी मिळून अत्याचार केल्याचा आरोप संबंधित तरुणीने केला आहे. तरुणीच्या तक्रारीच्या आधारे पडघा पोलिसांनी नरेंद्र पवार आणि शैलेश पाटील यांच्याविरोधात सामूहिक अत्याचारासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली असून दोन्ही आरोपींचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

या घटनेनंतर संबंधित तरुणीने स्वतःसह आपल्या कुटुंबीयांच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली आहे. भविष्यात आपल्याला किंवा आपल्या कुटुंबीयांना कोणतीही इजा झाल्यास त्यासाठी नरेंद्र पवार आणि शैलेश पाटील जबाबदार असतील, अशी भीती तिने माध्यमांना प्रतिक्रिया देताना व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया व्यक्त करताना काँग्रेसच्या गटनेत्या (क.डो.म.पा.) कांचन कुलकर्णी यांनी भाजपवर टीका केली आहे. महिलांच्या सन्मानाबाबत भाजपकडून विविध योजना आणि भूमिका मांडल्या जात असताना, या प्रकरणातील आरोप गंभीर असल्याचे सांगत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. "एकीकडे महिलांच्या सन्मानाची भूमिका मांडली जाते, तर दुसरीकडे अशा प्रकारचे गंभीर आरोप समोर येत आहेत. महिलांच्या सन्मानाबाबत ही दुहेरी भूमिका आहे का?" असा सवाल कांचन कुलकर्णी यांनी उपस्थित केला.

# लक्ष्मण शेट्टीवार शिवसेनेच्या बिलोली शहर प्रमुख पदी

बिलोली : (स. गांवकरी)

येथील नगरपालिकेचे माजी नगरसेवक लक्ष्मण शेट्टीवार यांना आता शिवसेना पक्षाच्या वतीने संघटनात्मक मोठी जबाबदारी देण्यात आली असून नुकतीच त्यांची शिवसेनेच्या बिलोली शहर प्रमुख पदी निवड झाली करण्यात आली आहे. शिवाय याच कार्यकारणीत शहर संघटक पदी येथील माजी उपाध्यक्ष आनंद गुडमुलवार यांची सुद्धा निवड करण्यात आली आहे.



बिलोली तालुका शिवसेना पक्षात आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्ष बांधणी करण्यात आली असून यात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. पक्षाला अधिकाधिक बळकटी मिळावी यासाठी शहरातील अनेकांना यात स्थान देण्यात आले. ज्यात बिलोली नगरपालिकेचे माजी नगरसेवक लक्ष्मण शेट्टीवार यांची शिवसेनेच्या शहर प्रमुख पदी वर्णी लागली . शेट्टीवार हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय क्षेत्रात अग्रेसर असतात शहरात त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्यामुळे आगामी नगरपालिकेच्या उद्देशाने शिवसेना पक्षाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्यासोबत शेट्टीवार यांचे मागील काही दिवसापासून स्नेहाचे संबंध राहिले आहेत. शहर व तालुक्यातील अनेक कार्यक्रमांमध्ये ते त्यांच्यासोबत दिसतात. शेट्टीवार यांच्या निवडीने शिवसेना पक्षाला येथे चांगले दिवस येऊ शकतात. असे येथील जाणकारातून बोलले जाते.मागील डिसेंबर महिन्यात झालेल्या न. प. निवडणुकीत शेट्टीवार यांच्या सौभाग्यवती सौ. सुजाता लक्ष्मण शेट्टीवार यांचा अल्पशा मतांनी पराभव झाला होता. शिवसेनेला एक युवा आणि आक्रमक चेहरा म्हणून शहर प्रमुख शेट्टीवार यांच्या रूपाने मिळाला आहे. ज्यामुळे पक्षाला बळकटी मिळेल. शेट्टीवार यांच्याबरोबर येथील माजी उपाध्यक्ष आनंद गुडमुलवार यांची सुद्धा शिवसेनेच्या शहर संघटक पदी निवड करण्यात आली.

दोघांनाही निवडीचे पत्र एका कार्यक्रमात देण्यात आले.शेट्टीवार व गुडमूलवार या दोघांच्याही निवडीचे शहरात स्वागत करण्यात आले. तर उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर,शिवसेनेचे तालुकाप्रमुख बाबाराव पाटील रोकडे, माजी नगराध्यक्ष विजय कुंचनवार, उपतालुका प्रमुख वसंत जाधव यांच्यासह अनेकांनी शेट्टीवार व गुडमूलवार यांचे अभिनंदन केले आहे.

# आप्पासाहेब कांबळे सर यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार प्रदान



कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा येथील रहिवासी आणि समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक आप्पासाहेब फक्कड कांबळे सर यांना शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी केल्याबद्दल 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. स्विफ्ट अँड लिफ्ट मीडिया ग्रुपच्या वतीने प्रतिष्ठेचा असा समजला जाणारा हा राज्यस्तरीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक आप्पासाहेब फक्कड कांबळे सर यांना प्रसिद्ध उद्योजक नवनाथ येवले, मराठी कवयित्री कविता काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे सचिव काझी हैदर यांचे तेरावे वंशज सोहेल शमशुद्दीन शेख व शिफ्ट अँड लिफ्ट ग्रुपचे प्रमुख निलेश साबे यांच्या हस्ते नटसम्राट निळू फुले सभागृह पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कांबळे यांचे ग्रामीण भागात समाजिक कार्य करताना ग्रामीण विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सुविधा मिळवून देण्यात मोलाचे योगदान ठरले आहेत.

# आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सर्व क्रेडिट कार्डवर 'झिरो फॉरेक्स मार्कअप'

मुंबई : (स. गांवकरी)

IDFC FIRST Bank

ग्राहकांना प्राधान्य देण्याच्या धोरणांतर्गत आयडीएफसी फर्स्ट बँकेने आपल्या सर्व विद्यमान तसेच नवीन क्रेडिट कार्डधारकांसाठी विनाअट 'झिरो फॉरेक्स मार्कअप' सुविधा जाहीर केली आहे. अशा प्रकारची सुविधा सर्व क्रेडिट कार्डांवर देणारी भारतातील पहिली बँक असल्याचा दावा बँकेने केला आहे. या सुविधेसाठी ग्राहकांना नवीन क्रेडिट कार्ड घेण्याची, विद्यमान कार्ड अद्ययावत करण्याची किंवा ठराविक रकमेची आंतरराष्ट्रीय खरेदी करण्याची आवश्यकता नाही. बँकेच्या विद्यमान क्रेडिट कार्डांवर ही सुविधा आपोआप लागू होणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर सामान्यतः ३.५ टक्क्यांपर्यंत फॉरेक्स मार्कअप शुल्क आणि त्यावर वस्तू व सेवा कर आकारला जातो. उदाहरणार्थ, एक लाख रुपयांच्या व्यवहारावर या शुल्कामुळे सुमारे ४,१३० रुपयांची अतिरिक्त रक्कम भरावी लागू शकते. 'झिरो फॉरेक्स मार्कअप' सुविधेमुळे आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ग्राहकांना ही अतिरिक्त रक्कम वाचवता येणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांवरील फॉरेक्स मार्कअप शुल्क रद्द करण्यात आले असले तरी, संबंधित कार्डाच्या नियमानुसार मिळणारे रिवॉर्ड पॉईंट्स किंवा कॅशबॅकचे फायदे ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच मिळत राहणार आहेत. फॉरेक्स मार्कअप शुल्क टाळण्यासाठी ग्राहकांकडून स्वतंत्र फॉरेक्स कार्डचा वापर केला जातो. मात्र, नव्या सुविधेमुळे आयडीएफसी फर्स्ट बँकेचे विद्यमान क्रेडिट कार्डच आंतरराष्ट्रीय खर्चासाठी अधिक किफायतशीर पर्याय ठरणार आहे.

# 'सेवा संकल्प अभियानासह' विविध उपक्रमांचा शुभारंभ

- पोषण, आरोग्य, शिक्षण व कृषी विभागाच्या समन्वयातून ग्रामस्थांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यावर भर

कल्याण : (स. गांवकरी)

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, कल्याण अंतर्गत पंचायत समिती येथे आज,दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ करण्यात आला. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी रघुनाथ गवारी यांच्या उपस्थितीत आयोजित या कार्यक्रमास तालुका वैद्यकीय अधिकारी आशा मुंजाळ, कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, गट शिक्षण अधिकारी सुनीता मोटघरे, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी तसेच पंचायत समितीच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, कल्याणच्या मुख्य सेविका उषा लांडगे व प्रद्न्या निपुर्ते यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सेवा संकल्प अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती बाल विकास प्रकल्प अधिकारी, कल्याण धनश्री मोहनराव साळुंखे यांनी दिली.



सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून अंगणवाडी उत्सव, पोषण व आरोग्यविषयक मार्गदर्शन, आरोग्य तपासणी यांसह विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून बालक, महिला व कुटुंबांपर्यंत आवश्यक माहिती व शासकीय सेवांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.

यावेळी आरोग्य विभाग, कृषी विभाग आणि शिक्षण विभागाच्या समन्वयाने राबविण्यात येणाऱ्या नवीन उपक्रमांची माहिती धनश्री साळुंखे यांनी दिली. विविध विभागांनी परस्पर समन्वयाने काम केल्यास शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊन त्याचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, यावर यावेळी भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोषण अभियानाची शपथ तसेच 'बालस्नेही गाव' शपथ घेतली. बालकांचे आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे मानवी साखळी तयार करून सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विभागीय समन्वय, नागरिकाभिमुख सेवा आणि ग्रामविकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संदेश दिला.

# ओझोनचा थर हा पृथ्वीचा संरक्षक : प्रा. अंकुश मोघे



जुन्नर तालुका: (स. गांवकरी)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.अंकुश मोधे उपस्थित होते. कार्यक्रमा चे प्रास्ताविक भूगोल विभागा चे प्राध्यापक डॉ.ए.टी.पाडवी यांनी केले.त्यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतामध्ये जागतिक ओझोन दिनाचे सामाजिक आणि भौगोलिक महत्त्व अधोरेखित केले. वाढत्या औद्योगिकी करणामुळे व आधुनिक जीवन शैलीमुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढत असून त्याचा थेट परिणाम ओझोनच्या थरावर होत आहे,याकडे त्यांनी लक्ष वेधले.कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा.अंकुश मोधे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ओझोन थराला "पृथ्वीचे सुरक्षा कवच" असे संबोधले. त्यांनी स्पष्ट केले की, सूर्या पासून येणाऱ्या अतिनील किरणांपासून मानवांचेच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीचे रक्षण करण्याचे कार्य ओझोन करते. परंतु गेल्या काही दशकांत प्रदूषण, मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड आणि क्लोरोफ्लोरोकार्बन (CFC) वायूचे वाढते उत्सर्जन यामुळे ओझोन थराचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. हा धोक्याचा इशारा असून प्रत्येकाने पर्यावरण संवर्धना कडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात,"ओझोनच्या ऱ्हासा मुळे निर्माण होणाऱ्या जागतिक तापमानवाढीच्या समस्येवर प्रकाश टाकला. हवामानातील बदल, वितळणारे हिमनग,दुष्काळी परिस्थिती,अतिवृष्टी आणि अनियमित पर्जन्यमान ही सर्व लक्षणे याच समस्येचीपरिणती असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून झाडे लावणे,प्लास्टिकचा कमी वापर करणे, सायकलचा वापर करणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे ही त्यांनी प्रतिपादन केले."

# भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचे प्रत्यक्ष काम तातडीने सुरू करा

■ भूसंपादनासाठी ३० कोटींचा निधी तातडीने वर्ग करण्याची स्मारक समितीची मागणी

पुणे/मुंबई : (स. गांवकरी)



भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभ स्मारकाच्या मंजूर १०० कोटी रुपयांच्या बृहत् विकास आराखड्यांतर्गत प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी भीमा कोरेगाव विजयस्तंभ राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि पुण्याचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. स्मारकाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी ३० कोटी रुपयांचा निधी तातडीने वर्ग करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. पुणे दिवाणी न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालात विजयस्तंभ स्मारकासाठी जागा संपादित करताना कायदेशीर प्रक्रिया राबविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर डंबाळे आणि डॉ. धेंडे यांनी सामाजिक न्याय मंत्र्यांसह पुणे जिल्हाधिकाऱ्यांनाही स्वतंत्र निवेदन दिले आहे. संयुक्त निवेदनात राहुल डंबाळे आणि डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारने २०२७ पर्यंत विजयस्तंभ परिसराचा विकास करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सुशोभीकरणासह आवश्यक पायाभूत सुविधांची कामे तातडीने सुरू होणे गरजेचे आहे. न्यायालयाच्या आदेशाचा पूर्ण आदर राखून संबंधित जमिनीच्या भूसंपादनाची कायदेशीर प्रक्रिया प्रशासनाने समांतरपणे आणि वेगाने पूर्ण करावी.

## थोडक्यात बातम्या...



### छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात हिंदी दिवस उत्साहात साजरा

देवळाली (स. गांवकरी) : देवळाली येथील श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदी दिवस उत्साहात संपन्न झाला. विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रायते सर हे होते. तर उपप्राचार्या श्रीमती दिघे मॅडम, पर्यवेक्षक डोफे सर, साबळे सर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विविध उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी हिंदी दिनाचे औचित्य साधून मनोगत व्यक्त केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख सर, तातळे सर , धाडगे सर , कल्हापुरे सर दरेकर सर श्रीमती शेळके मॅडम ,श्रीमती शिंदे मॅडम, श्रीम शेख मॅडम यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी शिक्षक व विद्यार्थ्यांचा योग्य तो सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हिंदी दिवसाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### चिकार फळियातील घराजवळ घुसला बिबट्या, बांधलेल्या बैलाची शिकार

डांग- गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील नडगखाडी गावातील चिकार फळियात शिकारीच्या शोधात आलेल्या बिबट्याने रहिवासी घराजवळील जनावरांच्या गोठ्यात घुसून बांधलेल्या बैलाची शिकार केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 16 सप्टेंबर 2026 रोजी रात्री उशिरा घोघली फीडरमध्ये बिघाड झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. याच अंधाराचा फायदा घेत बिबट्या चिकार फळियातील रहिवासी राजूभाई शिलुभाई चौधरी यांच्या घराजवळ असलेल्या जनावरांच्या गोठ्यात घुसला. गोठ्यात बांधलेल्या बैलावर बिबट्याने हल्ला करून त्याची शिकार केली. दरम्यान, इतर जनावरांचे घाबरलेले आवाज ऐकून घरातील सदस्य जागे झाले. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्याने अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नेते रवींद्रभाई भिवशन यांच्या मदतीने घरमालक राजूभाई चौधरी यांनी चिंचिनागांवठा वनपरिक्षेत्राच्या RFO यांना लेखी माहिती दिली.

### दक्षम कॅपिटलमध्ये सौरभ मुंढड़ा यांची सह-संस्थापकपदी नियुक्ती



पुणे (स. गांवकरी) : व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार गुंतवणूक व भांडवली उपाययोजना उपलब्ध करून देणाऱ्या दक्षम कॅपिटलने सौरभ मुंढड़ा यांची सह-संस्थापक आणि पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती १ ऑगस्ट २०२६पासून लागू झाली आहे. कॉर्पोरेट बँकिंग, भांडवली बाजार, धोरणात्मक वित्त आणि सल्लागार क्षेत्रातील दोन दशकांहून अधिक अनुभवाच्या बळावर मुंढड़ा पश्चिम विभागातील दक्षम कॅपिटलच्या सल्लागार व्यवसायाच्या विस्ताराचे नेतृत्व करणार आहेत. दक्षम कॅपिटल सध्या संपत्ती सल्ला, खासगी भांडवल आणि धोरणात्मक सल्ला या क्षेत्रांमध्ये संशोधनाधारित व्यासपीठ विकसित करत आहे. कुटुंबीय कार्यालय सल्ला, खासगी बँकिंग, गुंतवणूक बँकिंग, मालमत्ता व्यवस्थापन आणि संरचित आर्थिक उपाययोजना अशा विविध सेवांच्या माध्यमातून उद्योजक, प्रवर्तक, कुटुंबे आणि व्यवसायांशी संबंध अधिक दृढ करण्यावर कंपनीचा भर आहे.

### साध्या पोटाच्या त्रासाच्या तपासणीत किडनीचा कर्करोग

पुणे (स. गांवकरी) : जुलाबाच्या त्रासासाठी करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत किडनीमध्ये कर्करोगाची गाठ आढळलेल्या ४४ वर्षीय महिलेवर भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये किडनी वाचविणारी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली. कर्करोगाची गाठ पूर्णपणे काढण्यात आली असून संपूर्ण किडनी काढण्याची गरज भासली नाही. रुग्णाची प्राथमिक तपासणी मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. रिझवान मलिक यांनी केली. सोनोग्राफीदरम्यान किडनीमध्ये गाठ आढळल्यानंतर कॉन्ट्रास्ट सीटी स्कॅन करण्यात आला. त्यामध्ये उजव्या किडनीमध्ये रेनल सेल कार्सिनोमाचा संशय असलेली गाठ आढळून आली. त्यानंतर रुग्णाला मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. निखिल थर्स्टिंग आणि सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशिष बांगर यांच्याकडे पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले.

# १८ गावांमध्ये ग्रामस्तरीय बाल संरक्षण समित्यांची स्थापना

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



चाइल्डफंड इंडिया आणि बजाज फिनसर्व यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या वेब सेफ अँड वाईज प्रकल्पांतर्गत जुन्नर विभागा तील उदापूर, डिंगोरे, मुथाळणे, कोळवाडी, वाटखळ, कोपरे, मांडवे, सितेवाडी, निमगिरी, तळेरान, गोदरे, खामगाव, खुबी बल्लाळवाडी, करंजाळे, देवळे मढ आणि बगाडवाडी या १८ गावांमध्ये ग्रामस्तरीय बाल संरक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांच्या माध्यमातून मुलांचे संरक्षण, डिजिटल सुरक्षा व ऑनलाइन जोखमींबाबत गावपातळीवर जनजागृती व मार्गदर्शन करण्यात येणार आहेसध्याच्या डिजिटल आणि मोबाईलच्या युगात मुलांचा मोबाईल, इंटरनेट,विविध ऑनलाइन माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्यासोबत सायबर फसवणूक, ऑनलाइन छळ,अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क, वैयक्तिक माहितीचा गैरवापर तसेच इतर डिजिटल जोखमीं चा सामना मुलांना करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर मुलांना सुरक्षित,जबाबदार आणि सकारात्मक डिजिटल वापराबाबत योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. वेब सेफ अँड वाईज प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्तरीय बाल संरक्षण समित्यांच्या सदस्यांची क्षमता वाढविण्यात आली असून, त्यांना बाल हक्क,बाल संरक्षण,डिजिटल सुरक्षा, ऑनलाइन जोखमी ओळखणे प्रतिबंधात्मक उपाययोजना, तक्रार व संदर्भ यंत्रणा तसेच मुलांना सुरक्षित ऑनलाइन वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पालक व समुदाया ची भूमिका याबाबतमार्गदर्शन करण्यात आले आहे.आगामी काळात या समित्यांच्या माध्य मातून गावागावात मुलां सोबतच पालक,शिक्षक आणि समुदायातील संबंधित व्यक्तीं साठी डिजिटल सुरक्षा व बाल संरक्षण विषयक विविध जन जागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिनू वर्गीस,प्रोजेक्ट मॅनेजर कुमारी अर्चना लाडे,जुन्नर प्रकल्पाचे अभिजीत मदने, अजित सौर,रवी शिंदे,विश्वास गालफाडे,कविता घोलप, दिपाली जगताप,शेवंता वाघ, योगेश मस्करे, संजय नवले, मंगेश अटकर,सौरव दिघे, रोहित शिंदे,अनंत बोराडे, मुक्ता गिरी आणि प्रवीण जगताप यांनी विशेष सहकार्य केले. या उपक्रमातून “सुरक्षित बालपण, सुरक्षित डिजिटल भविष्य”या उद्देशाने गाव पातळीवर बाल संरक्षणासाठी अधिक सक्षम,जागरूक आणि जबाबदार समुदाय व्यवस्था निर्माण करण्यास मदत होणार आहे.

# इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची ICAच्या ग्लोबल बोर्डावर निवड

पुणे : (स. गांवकरी)



भारतीय सहकार क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या घडामोडीत इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (ICA) ग्लोबल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर ‘अॅट-लार्ज डायरेक्टर’ म्हणून निवड झाली आहे. पनामा येथे झालेल्या ICAच्या महासभेदरम्यान झालेल्या निवडणुकीत सांघाणी यांना ही जबाबदारी मिळाली. सांघाणी यांच्या विजयाची घोषणा होताच पनामा येथे उपस्थित भारतीय सहकारी प्रतिनिधी मंडळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रतिनिधींनी ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’च्या घोषणा देत आनंद व्यक्त केला. जागतिक सहकार क्षेत्राच्या व्यासपीठावर भारतीय प्रतिनिधीची झालेली निवड ही देशाच्या सहकार चळवळीच्या वाढत्या प्रभावाचे द्योतक मानली जात आहे. दिलीप सांघाणी गेल्या अनेक दशकांपासून सहकार क्षेत्राशी संबंधित असून, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण यासाठी त्यांनी काम केले आहे. ते सध्या इफ्को तसेच गुजरात को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (गुजकोमासोल)चे अध्यक्ष आहेत.

# दिव्यात चिमुकलीचा आईकडून अमानुष छळ व अत्याचार

ठाणे : (स. गांवकरी)



दिवा पोलीस चौकी (मुंब्रा पोलीस ठाणे) हद्दीत एका निष्पाप लहान मुलीवर तिच्याच आईने अमानुष अत्याचार केल्याची मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. १४ सप्टेंबर २०२६ रोजी याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. 1581/ 2026 नुसार दाखल करण्यात आला आहे. साबेगाव येथील डीजे कॉम्प्लेक्स परिसरात राहणाऱ्या एका महिलेने स्वतःच्या लहान मुलीला अमानुषपणे मारहाण केली तसेच शरीरावर चटके देऊन तिला दुखापत केली. या क्रूर प्रकाराची माहिती 'युनिव्हर्सल ह्युमन राईट्स कौन्सिल भारत'च्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्ष सौ. सुवर्णाताई कदम यांना मिळाली. त्यांनी त्वरित घटनेचे गांभीर्य ओळखून चाईल्ड हेल्पलाईनच्या ठाणे जिल्हा समन्वयक श्रद्धा नारकर यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. श्रद्धा नारकर यांच्या मार्गदर्शनानुसार तातडीने सूत्रे हलवून पोलिसांनी या प्रकरणी कारवाई केली. प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनवणे व पोलीस उप निरीक्षक अंबादास सावंत यांनी आरोपी महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आहे. सदर घटनेनंतर पीडित बालिकेच्या सुरक्षिततेचा विचार करून बाल कल्याण समिती, ठाणे यांच्या लेखी आदेशानुसार तिची उल्हासनगर येथील बालगृहात रवानगी करण्यात आली आहे. या घटनेमुळे दिवा व साबेगाव परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत असून दोषी आईवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते ध्वजारोहण; विद्यापीठ परिसरात १११ वृक्षांची लागवड

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने आयोजित ध्वजारोहण समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज तसेच विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ३२ झाडे, तर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त ७९ झाडे, अशी एकूण १११ झाडांची लागवड विद्यापीठ परिसरात करण्यात आली आहे. सर्वप्रथम कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय ध्वजारोहण आणि विद्यापीठ ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत आणि विद्यापीठ गीताचे गायन करण्यात आले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी विद्यापीठाची शैक्षणिक, संशोधनात्मक व प्रशासकीय क्षेत्रातील विकासाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल यावर थोडक्यात भाष्य केले. विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकजुटीने योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. ध्वजारोहण समारंभानंतर विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या वृक्षारोपण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यापीठ परिसर अधिक हिरवाईने नटावा, पर्यावरणाचा समतोल राखला जावा आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व सुंदर परिसर मिळावा, या उद्देशाने या उपक्रमाला विशेष महत्त्व देण्यात आले. दरम्यान, विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विद्यापीठाचे सर्व संवैधानिक अधिकारी, अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विविध संकुलांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनाचा हा सोहळा राष्ट्रभक्ती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# जनकल्याण महामार्गाचे काम बंद करावे अन्यथा मारणारे बैल आणून आंदोलन

जुन्नर तालुका - रविंद्र भोर (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील प्रस्तावित जनकल्याण कल्याण-लातूर महामार्ग जनतेचे कल्याण करणारा नसून शेतकरी व आदिवासी जनतेला नेस्तनाबूत करणारा असून महामार्गाचे प्रस्तावित काम त्वरित थांबवावे अन्यथा अत्यंत तीव्र आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशारा पुणे जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष व आदिवासी वादळ, नेते देवराम लांडे यांनी उदापुर बनकर फाटा येथील बाधित शेतकरी आंदोलनात सरकार ला दिला.

जुन्नर तालुक्यातील प्रस्तावित कल्याण-लातूर जन कल्याण महामार्गाला बाधित १६ गावांतील शेतकऱ्यांकडून तीव्र विरोध होत आहे.या प्रकल्पामुळे जमिनी संपादित होण्याच्या भीतीने शेतकरी व नागरिक रस्त्यावर उतरले आहेत.प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पाला विरोध करण्यासाठी बुधवार दि:-१६ रोजी उदापुर ता:-जुन्नर येथील बनकर फाटा येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. जनकल्याण महामार्गातून जुन्नर तालुका वगळण्याची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.या लढ्यासाठी माजी आमदार बाळासाहेब दांगट यांच्या नेतृत्वाखाली बाधित गावातील शेतकऱ्यांची समिती स्थापन केली आहे.समिती रस्तावर उतरून जनआंदोलन उभारून विरोध करणार आहे. तसेच,न्यायालयीन लढा लढून कायदेशीर बाजूही मांडणार आहे.तसेच,वैचारिक लढा लढून प्रकल्पांचे दुष्परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास व शेतीचे होणारे नुकसान याबाबत राजकीय व प्रशासकीय पातळीवर माहिती देऊन प्रकल्प रद्द करण्याची मागणी करणार असल्याचे दांगट यांनी जाहीर केले. या वेळी आयोजित सभेत माजी आमदार अतुल बेनके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराम लांडे,सदस्य अंकुश आमले,बबन तांबे,कृती समितीचे कार्याध्यक्ष सुरज वाजगे,शेतकरी नेते अंबादास हांडे,भगवान घोलप,बापूसाहे ब कुमकर,विकास राऊत, विनोद केदारी,दत्तात्रय डुंबरे, पंकज हांडे,मंदाकिनी दांगट, संतोष घोटणे,लक्ष्मण जोशी व सोळा गावातील शेकडोबाधित शेतकरी व महिला उपस्थित होत्या. यावेळी तहसीलदारांना जुन्नर तालुक्यातील प्रस्तावित कल्याण-लातूर जनकल्याण महामार्ग रद्द व्हावा,या मागणी चे निवेदन देण्यात आले. उप विभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शना खाली मोठा पोलिस बंदोबस्त सज्ज केला होता.

## ‘दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन’

यावेळी अतुल बेनके म्हणाले,"प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला बरोबर घेऊन पुणे जिल्हा आधिकाऱ्यांना भेटलो,परंतु त्यांना प्रकल्पाबाबत कोणती ही माहिती नाही.प्रकल्पाची सद्यःस्थिती व प्रशासकीय हालचाली जाणून घेण्यासाठी लवकरच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत तालुक्यातील सर्वपक्षीय प्रतिनिधी व शेतकऱ्यांची भूमिका मांडून हा मार्ग रोखण्यासाठी अथवा पर्यायी मार्गाचा विचार करण्यासाठी दबाव वाढवला जाईल.शेवट पर्यंत बाधित शेतकऱ्यांबरोबर राहणार आहे.प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल."

-माजी आमदार, अतुल बेनके, जुन्नर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार दि. १८ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# वैद्यकीय शिक्षणामध्ये राज्याची गरूडझेप

## मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर 'सहयोगी व आरोग्यसेवा परिषद' स्थापनेच्या कार्यवाहीला गती

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील आरोग्यसेवा आणखीन सुधारण्यासाठी आणि नागरिकांना उत्तम पद्धतीची सेवा लाभण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यसेवेत राज्याची मोठी झेप घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर आता 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषद'ची स्थापना करण्यात येणार आहे. या परिषदेच्या स्थापनेला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयामुळे राज्यातील आरोग्यसेवा, व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम सोबतच जागतिक दर्जाचे होणार आहे. राज्यातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला अधिक दर्जेदार आणि प्रगत बनवण्याच्या दिशेने हा निर्णय महत्वपूर्ण ठरणार आहे.

राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम राज्यात लागू करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्यातील सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी उत्तम दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी या परिषदेच्या स्थापना करण्यात आली होती. शिवाय, या परिषदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक नियमावलीही तयार करण्यात आली होती. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, राष्ट्रीय स्तरावरील सध्याचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६– २७ पासून संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले उचलली जात आहेत. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि कामामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी या परिषदेअंतर्गत चार महत्त्वपूर्ण स्वायत्त मंडळांची स्थापना केली जाणार आहे. पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ आणि सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळ अशा चार मंडळांची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या या व्यावसायिकांच्या नोंदणी प्रक्रियेबाबत केंद्राच्या मार्गदर्शक तत्वांच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली असून ३१ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. यामुळे पुढील कार्यवाही सुरू करण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे सज्ज झाले आहे.

महाराष्ट्रात फिजिओथेरपिस्ट, रेडियोग्राफर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नेत्रतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ आणि इतर ५० हून अधिक विषयांचे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेता येणार आहे. याचीही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून राज्यातील आरोग्यसेवा क्षेत्रात पारदर्शकता आणि सक्षमता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित यंत्रणांमध्ये योग्य समन्वय साधून या परिषदेचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबवण्यावर भर दिला जात आहे. या ऐतिहासिक कार्यवाही मुळे राज्याच्या सहयोगी व आरोग्यसेवा क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक मानके, उत्तम



आचारसंहिता, योग्य मूल्यांकन आणि एक अत्यंत सक्षम व उत्तरदायी व्यवस्था निर्माण होण्यास मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी आणि रुग्णांच्या सेवेसाठी हा निर्णय एक मोठा मैलाचा दगड ठरणार आहे.

## संक्षिप्त

### एनसीएमसी कार्डधारकांसाठी आता भीम पद्वारे सहज टॉप अप करता येणार

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांसाठी डिजिटल सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. एनसीएमसी कार्डधारकांना आता भीम पच्या माध्यमातून आपल्या कार्डचे टॉप अप करता येणार आहे.

त्यामुळे कार्डमध्ये शिल्लक रक्कम संपल्यानंतर पुन्हा रिचार्ज करण्यासाठी केंद्रावर जाण्याची आवश्यकता राहणार नसून, मोबाईलच्या माध्यमातून घर बसल्या कार्डमध्ये रक्कम जमा करता येणार आहे.

### मराठमोळे अधिकारी संजय लाठकर यांची अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी नियुक्ती

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मराठवाड्यातील संजय आनंदराव लाठकर यांच्यावर देशाच्या अणुऊर्जा क्षेत्राशी संबंधित सुरक्षेची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लातूरचे माजी पोलीस अधीक्षक आणि नांदेडचे रहिवासी असलेल्या लाठकर यांची केंद्र सरकारच्या अखत्यारीतील अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

देशातील अणुऊर्जा केंद्रे, संबंधित संस्था तसेच किरणोत्सारी पदार्थांच्या साठ्यांच्या सुरक्षेचे व्यवस्थापन त्यांच्या अखत्यारीत राहणार आहे.

# राज्यावर 'पाणीटंचाई'चे सावट, टंचाईग्रस्त गावांचा आराखडा तयार करण्याचे निर्देश

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील अनेक भागांत सप्टेंबरचा निम्म्याहून अधिक कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी गाव आणि वाड्यांची यादी तयार करून उपाययोजनांचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत पिके आणि पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला होता. पावसाने ओढ दिल्याने टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने टंचाई कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात शासन परिपत्रक जारी केले. त्यानुसार आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता असलेल्या गावांची आणि वाड्यांची यादी तयार करण्याची जबाबदारी तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

या दोन्ही अधिकाऱ्यांनी संयुक्त अहवाल तयार करून तो ऑक्टोबरमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करायचा आहे. ज्या गावांमध्ये चालू वर्षी पाणीटंचाई निवारणाच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशाच गावांचा कृती आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आराखडा तयार करताना संबंधित गावांची यादी, ग्रामपंचायतीचा प्रस्ताव तसेच मागील तीन वर्षांत पाणीटंचाई निवारणासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च विचारात घेण्याच्या सूचना आहेत. ऑक्टोबर ते जून २०२७ या नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी आराखडा तयार केला जाणार असून, त्यासाठी १५ नोव्हेंबर, २० डिसेंबर २०२६ आणि २० जानेवारी २०२७ अशा टप्प्यांमध्ये वेळापत्रक सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर लक्ष**

पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करण्यासाठीही निर्बंध घालण्यात आले आहेत. पाण्याच्या स्रोतांच्या ५०० मीटर परिसरात पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी विहीर खोदण्यास परवानगी देऊ नये, असे निर्देश आहेत. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर भूजल उपशाचा प्रतिकूल परिणाम होत असल्यास संबंधित विहिरींमधून भूजल उपसा काही कालावधीसाठी थांबविण्याची कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांपासून एक किलोमीटर अंतरातील विहिरींमधून होणाऱ्या भूजल उपशावर तात्पुरती बंदी आणण्याची कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**टँकर शेवटचा पर्याय :** पाणीटंचाई निवारणासाठीच्या दहा उपाययोजनांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यास शेवटचे प्राधान्य देण्यात आले आहे. टँकर वगळता अन्य नऊ उपाययोजनांना प्रथम प्राधान्य द्यावे आणि त्या शक्य नसलेल्या ठिकाणीच टँकर किंवा बैलगाडीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. टँकरने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता भासल्यास त्याच्या फेऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी टँकरवर जीपीएस यंत्रणा बसविण्याची अट निविदा स्वीकारताना तसेच टँकरधारकांशी करण्यात येणाऱ्या करारात समाविष्ट करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते नवी दिल्लीत 'सेमिकॉन इंडिया २०२६' चे भव्य उद्घाटन

## सेमीकंडक्टर अभियानाच्या १३.५ अब्ज डॉलरच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे 'सेमिकॉन इंडिया २०२६' परिषदेचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. या परिषदेच्या पाचव्या आवृत्तीचे महत्त्व अधोरेखित करताना पंतप्रधानांनी सर्व परदेशी पाहुणे व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचे मनापासून स्वागत केले. यंदा या परिषदेचा योग 'विश्वकर्मा दिवसाशी' जुळून आल्याने, देशाच्या प्राचीन पारंपरिक सृजनशक्तीचा २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाशी झालेला हा सुंदर संगम 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' घडवण्याची मुख्य प्रेरणा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




# भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार अन् बडतर्फ पोलिसाच्या विरोधात भिवंडीत सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल

**कल्याण (समर्थ गांवकरी)**





कल्याण शहरात मदत करण्याच्या बहाण्याने पिडीत तरुणीस आपल्या कार्यालयात बोलावून तिला भिवंडी तालुक्यातील बापगाव येथे नेऊन तिच्यावर शारीरिक अत्याचार केल्या प्रकरणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार व बडतर्फ पोलिस कर्मचारी शैलेश पाटील यांच्या विरोधात पडघा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी पहाटे शस्त्राचा धाक दाखवून दारू पाजून सामूहिक शारीरिक अत्याचार केल्या प्रकरणी पिडीत तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान २२ वर्षांच्या पिडीत विवाहित तरुणी हिचा पती सोबत वाद असल्याने त्या वादात मध्यस्ती करण्यासाठी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी तरुणीला आपल्या कार्यालयात बोलावले होते. त्यानंतर १३ सप्टेंबर रोजी माजी आमदार नरेंद्र पवार व त्यांचा साथीदार बडतर्फ पोलिस कर्मचारी शैलेश पाटील यांनी तिला भिवंडी तालुक्यातील बापगाव येथे आपल्या खाजगी मालमत्ता येथे घेऊन येत तिला शस्त्राचा धाक दाखवून दारू पाजून तिच्यावर शारीरिक अत्याचार केले. रात्री दोन वाजता माजी आमदार नरेंद्र पवार तेथून निघून गेल्यानंतर शैलेश पाटील याने सुद्धा या पिडीत तरुणीवर अत्याचार केल्यानंतर पहाटे चार वाजता शैलेश पाटील यांच्या घरचा केअर टेकर याने पिडीत तरुणीला तिच्या घरी आणून सोडले.

दरम्यान, घाबरलेल्या पिडीत तरुणीने १६ सप्टेंबर रोजी कॉंग्रेस नगरसेविका कांचन कुलकर्णी यांच्याकडे मदत मागितली. तेव्हा तरुणीने आपल्यावर भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार व बडतर्फ पोलिस कर्मचारी शैलेश पाटील याने अत्याचार केल्याचे व त्या संबंधी आपल्याकडे व्हिडिओ व मोबाईल व्हॉट्सप चॅट असल्याचे दाखविले. त्यानंतर पिडीत तरुणीला घेऊन रात्री कांचन कुलकर्णी पडघा पोलिस ठाण्यात दाखल झाल्या. तेथे पहाटे माजी आमदार नरेंद्र पवार व शैलेश पाटील या दोघांविरोधात सामूहिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी मला आता न्याय द्यावा, यांनी अशा पद्धतीने किती महिलांचे आयुष्य उध्वस्त केले असेल. त्यामुळे यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी पिडीत तरुणीने केली आहे. पिडीत तरुणीने माझ्या इंस्टाग्राम अकाऊंडवरील मोबाईलवर संपर्क साधून मदत मागितली. मी तिला भेटले असता तिने जी घृणास्पद हकीकत सांगितली ती ऐकून माझ्या पायाखालची जमीन हादरली. तिच्या जवळील व्हिडिओ व मोबाईल चॅट बघितल्यानंतर मी तत्काळ पिडीत तरुणीला घेऊन रात्री पडघा पोलिस ठाण्यात दाखल झाले. पोलिस महासंचालक सदानंद दाते यांना रात्री संपर्क केल्यानंतर त्यांनी पडघा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या. अशी माहिती कॉंग्रेस नगरसेविका गटनेत्या कांचन कुलकर्णी यांनी दिलीय.

# तालुक्यात विजेची अवस्था वाईट वेळप्रसंगी आंदोलन : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

## शेतकी संघाची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

■ नागरिकांसाठी पाणी आणि वीज अत्यंत महत्त्वाचे
■ तालुक्याच्या हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज मिळालीच पाहिजे : मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांची मागणी



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

सध्या राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके पाण्याअभावी सुकत चालली आहे. अशावेळी पिकांना पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र तालुक्यात विजेची अत्यंत वाईट अवस्था आहे. आवर्तन काळामध्ये ११ तास लाईट सुरू ठेवण्याबाबत न्यायालयाचे निर्देश असताना ही लाईट बंद ठेवली जात आहे. लाईट जाते म्हणजे पाणी पुढे पण जाते असे सांगताना शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी पाणी आणि वीज महत्त्वाची असल्याने वेळप्रसंगी आंदोलन केले जाईल असा इशारा काँग्रेस पक्षाचे नेते माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिला असून तालुक्याच्या हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज मिळालीच पाहिजे अशी मागणी त्यांनी केली आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सभागृहात संगमनेर शेतकी संघाच्या ६७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी चेअरमन संपतराव डोंगरे हे होते. तर व्यासपीठावर मा. आ.डॉ. सुधीर तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात, पांडुरंग पाटील घुले, आर.बी राहणे, गणपतराव सांगळे ,रामदास पाटील वाघ, शंकरराव खेमनर ,सुधाकर जोशी,व्हाईस चेअरमन सुनील कडलग, रामहरी कातोरे, शरद नाना थोरात, ड. नानासाहेब शिंदे, संपतराव गोडगे, ह भ प बुवाजी बाबा पुणेकर, शेतकी संघाचे संचालक साहेबराव बारवे, बाळकृष्ण होडगर, किरण नवले, भाऊसाहेब नवले, संतोष नागरे , शिवाजी आहेर,तुकाराम कोठवळ, सचिन दिघे, महादू खेमनर, संजय शिरसागर ,भास्कर गोपाळे, विनायक काळे ,सौ मंगलताई ठाकरे ,सौ प्रभावती ढोकरे, मॅनेजर अनिल थोरात, कार्यालयीन अधीक्षक बी. एन. काळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक क्रांती मधून शेतकऱ्यांसाठी बाजार समिती शेतकी संघ व सहकारी संस्था उभ्या केल्या. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, प्रभाकरराव भोर, बाळासाहेब गुंजाळ व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी शेतकी संघाची स्थापना केली. शेतकऱ्यांना मदतीसाठी हा संघ आहे. काटकसर हे या संघाचे वैशिष्ट्य राहिले आहे .

अमृत उद्योग समूहातील सहकारी संस्थांची शेतकी संघ ही मातृ संस्था आहे. राज्यातील अनेक शेतकी संघ मोडकळीच आले असताना संगमनेरचा शेतकी संघ मात्र दिमाखात उभा आहे.

नागरिकांचा शेतकी संघाच्या पेट्रोल पंपावर मोठा विश्वास असून आगामी काळामध्ये नवे पर्याय शोधावे लागणार असल्याचे सांगून शेतकी संघाच्या कामकाजाचे कौतुक केले.

याचबरोबर ते म्हणाले की सध्या तालुक्यामध्ये विजेची अत्यंत वाईट अवस्था आहे. याबाबत कोणी बोलत नाही. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. शेतकऱ्यांसाठी पाणी आणि वीज अत्यंत महत्त्वाची आहे. वीज जाते म्हणजे पाणी पुढे जाते हे लक्षात घ्या.

निळवंडे धरण व दोन्ही कालवे आपण पूर्ण केले .त्यावेळेस कुणी मदतीला आले नाही. संगमनेर शहरासाठी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवली. आता डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यांना अस्तरीकरण करून पाणी पुढे नेले जात आहे. तालुक्याच्या हक्काचे पाणी तालुक्याला मिळाले पाहिजे. याचबरोबर तालुक्यात विजेचा मोठा खेळखंडोबा आहे. रात्री ६ ते ९ या वेळेस सर्वत्र लोड शेडिंग केले जात आहे. मागील तीन-चार दिवसात तर पूर्णपणे विस्कळीतपणा झाला आहे. त्यावर कुणाचे नियंत्रण नाही.

१९८९ मध्ये भंडारदरा धरणाचे ३० टक्के हक्काचे पाणी आपण मिळवले. त्यानंतर मा. न्यायालयातून आवर्तन काळामध्ये ११ तास वीज मंजूर करून घेतली. हे सर्व संघर्ष करून मिळवले आहे. ते टिकवले पाहिजे. मात्र मागील दोन वर्षापासून पाणी व विजेबाबत पूर्णपणे अन्याय केला जात आहे. त्याबाबत कोणी बोलत नाही. शेतकरी व नागरिकांनी याबाबत जागरूक झाले पाहिजे.

तालुक्यात व सर्वत्र दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके सुकू लागली आहेत. पिकांना पाण्याची गरज आहे .अशावेळी विजेचा गोंधळ निर्माण केला जात जात आहे. तालुक्याचे हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने सुरळीत वीज मिळालीच पाहिजे अन्यथा वेळप्रसंगी आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असा इशारा त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

तर संपतराव डोंगरे म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकी संघाने रासायनिक खते, अन्नधान्य शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले आहे. तालुक्यामध्ये पेट्रोल पंपाची संख्या वाढली आहे. गावोगावी खतांचे दुकाने झाली आहेत. शेतकऱ्यांना मध्ये युरिया टंचाईला सामोरे जावे लागले लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या आग्रही मागणीमुळे सरकारने त्यांच्या ताब्यात असलेली बफरस्टॉक युरिया दिली . गुणवत्ता असल्यामुळे शेतकी संघाच्या पेट्रोल पंप व इतर धान्यांना मागणी आहे. ही वैभवशाली वाटचाल कायम सुरू ठेवून शेतकऱ्यांना मदत करावयाची असल्याचे ते म्हणाले.

यावेळी संगमनेर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते , सेवा सोसायटी यांची प्रतिनिधी चेअरमन व्हाईस चेअरमन व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वार्षिक सभेचे स्वागत व्हा.चेअरमन सुनील कडलग यांनी केले नोटीस वाचन मॅनेजर अनिल थोरात यांनी केले. तर मनीष गोपाळ यांनी आभार मानले.

# अकोले हॉस्पिटल व आयुष्यमान प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतील अडचणी दुर कराव्यात : मंडलिक

## सर्प उद्यान मंजुर करण्याचीही प्रमोद मंडलिक यांची मागणी

**अकोले (समर्थ गांवकरी)**

आदिवासी दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात सर्पदंश होऊन नागरिकांचे मृत्यु होत आहे. यासाठी विषबाधा पॅकेजचा पुर्नविचार करून अकोले हॉस्पिटलमधील तसेच आयुष्यमान प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतील अडचणी दुर कराव्यात तसेच अकोल्यामध्ये सर्प उद्यान मंजुर करावे अशी मागणी अकोले नगरपंचायतचे माजी नगरसेवक, अकोले शिवसेनेचे कार्याध्यक्ष प्रमोद मंडलिक यांनी केली आहे. याबाबत आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांना प्रमोद मंडलिक यांनी निवेदन दिले असुन, त्या निवेदनात म्हटले आहे कि अकोले तालुका हा अतिदुर्गम असुन, आदिवासी व दुर्गम भागात सर्पदंशाचे प्रमाण अधिक आहे. या विषबाधेच्या रूग्नांना सेवा देतांना आयुष्यमान प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत काम करतांना अडचणी येतात, त्या दुर होणे आवश्यक आहे.

याबाबत सर्पदंशावर कमीत कमी खर्च सुमारे १ लाखापर्यंत येत असतांना त्यासाठीचे पॅकेज अवघे ४३ हजार रूपयांचे आहे. त्यामुळे पॅकेजच्या खर्चाबाबत सुधारित पॅकेज घोषीत करून त्यानुसार रूग्नांना उपचारासाठी रक्कम अदा करण्यात यावी. तसेच रूग्नांना मॉनिटरींग करण्यासाठी अतिदक्षता विभागाची आवश्यकता असल्याचे कंपनीकडून सांगितले जाते. परंतु, प्रत्यक्षात ५ दिवस अतिदक्षता विभागात रूग्नांना ठेवले जाते. मात्र त्यांना जनरल वार्ड प्रमाणे पॅकेज घेण्याचे सांगितले जाते. मग वरील आर्थिक भार अकोले तालुक्यातील आदिवासी, गोरगरीब जनता सोसणार कसा? असा सवालही त्यांनी केला. याबाबत आरोग्य मंत्री अबिटकर यांना तातडीने आरोग्य सेवेचे आयुक्त यांना आदेश देऊन याबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे सुचविले आहे. यामुळे लवकरच आयुष्यमान प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नवीन पॅकेज चा समावेश होईल असा आशावाद अकोले नगरपंचायतचे माजी नगरसेवक, अकोले शिवसेनेचे कार्याध्यक्ष प्रमोद मंडलिक यांनी व्यक्त केला आहे.

तसेच अकोले तालुका हा आदिवासी व डोंगराळ तालुका असुन, येथे शेतकरी, शेतमजुर



मोठ्या प्रमाणात आहेत. ऐन पावसाळ्यात ८० दिवसांत तब्बल १३१ जणांना सर्पदंश झाला असुन, त्यातील काही रूग्ण दगावले देखील आहेत.

तरी याबाबत योग्य ती उपाययोजना करावी तसेच सर्प उद्यानास मंजुरी द्यावी, त्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे असेही मंडलीक यांनी सुचविले आहे.

# पद्मावती रोडवरील अनधिकृत स्वागत कमानीवर अतिक्रमण विभागाची कारवाई

## धर्मशाळेची फुटपाथ वरील कमान जेसीबीच्या सहाय्याने तोडली

**आळंदी (समर्थ गांवकरी)**

येथील आळंदी नगरपरिषदे मार्फत पद्मावती रोडवरील रस्त्याच्या हद्दीतील फुटपाथवर अनधिकृतपणे बांधण्यात आलेली धर्मशाळेची कमान जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली.

फुटपाथवर असलेली कमान अतिक्रमण निर्मूलन मोहिमे अंतर्गत पाडून कारवाई करण्यात आली.

कमान सार्वजनिक रस्ता व पादचारी मार्गाच्या हद्दीत उभारण्यात आल्याने पादचाऱ्यांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत होता. तसेच वाहतुकीच्या सुरळीत प्रवाहावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान नगरपरिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आवश्यक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने संपूर्ण प्रक्रिया नियमानुसार पार पाडण्यात आली. सार्वजनिक जागांचा मूळ उद्देश अबाधित ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित, अडथळामुक्त पादचारी मार्ग उपलब्ध करून देणे हा या कारवाईमागील प्रमुख हेतू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

तसेच अनाधिकृत बांधकाम वर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा यातून देण्यात आला.

आळंदी नगरपरिषदेकडून सार्वजनिक रस्ते, फुटपाथ, शासकीय जागा तसेच इतर सार्वजनिक मालमत्तांवरील अनधिकृत अतिक्रमणांविरुद्ध या पुढेही सातत्याने व नियमानुसार कारवाई करण्यात येणार असून



नागरिकांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण करू नये, तसेच अशा प्रकारांची माहिती नगरपरिषदेला द्यावी, असे आवाहन आळंदी नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

# 'मन लावून अभ्यास करा, आई-वडिलांचे नाव उज्वल करा' ; आमदार सत्यजित तांबे यांचा विद्यार्थ्यांना संदेश



**कोपरगांव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव तालुक्यातील जवळके येथील के. बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयास नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी भेट देत महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत जीवनात मोठे ध्येय ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयात विराजमान असलेल्या गणपती बाप्पाची आरती आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यानंतर आमदार तांबे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा. आपल्या जीवनात उत्तुंग भरारी घेण्याचे ध्येय ठेवावे आणि आपल्या आई-वडिलांचे नाव उज्वल करावे, असे आवाहन केले. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करून समाजासाठी योगदान देण्याचा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दरम्यान, महाविद्यालयाच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन संगणक तसेच विविध आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदत करण्यात आली. या सहकार्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डी. आर. सोनवणे यांच्या हस्ते आमदार सत्यजित तांबे यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

### गणपती बाप्पाच्या चरणी सुख-समृद्धीची प्रार्थना

महाविद्यालयातील गणपती बाप्पाची आरती आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी त्यांनी गणरायाच्या चरणी प्रार्थना करताना सर्वांना सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य लाभो आणि प्रत्येकाच्या जीवनात आनंद नांदो, अशी मनोभावे प्रार्थना केली

# डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची ७१ वी वार्षिक सभा उत्साहात

## सभासदांच्या विविध प्रश्नांवर झाली सविस्तर चर्चा; संचालक मंडळाकडून समाधानकारक उत्तरे

**डोंगरगाव (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आढळा विभागातील डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची ७१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता हनुमान मंदिर सभामंडपात संस्थेचे चेअरमन कोंडाजी नामदेव उगले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

सभेच्या प्रारंभी अध्यक्षपदासाठी दशरथ उगले यांनी सूचना मांडली, तर बंडोपंत उगले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर अहवाल सालात निधन झालेल्या सभासदांसह विविध क्षेत्रातील व्यक्ती तसेच संस्थेचे सेल्समन पोपट उगले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचे सचिव बाळासाहेब मोरे यांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. सन २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व व्यापारी पत्रके सभेसमोर सादर करण्यात आली.

सन २०२७-२८ साठी सभासदांची कमाल पतमर्यादा निश्चित करून बँकेकडे कर्ज मागणी करणे व त्याबाबत संचालक मंडळास अधिकार देणे, सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, कॅश क्रेडिटची मागणी करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे, सन २०२५-२६ चा लेखापरीक्षण अहवाल वाचून नमूद करणे व मागील दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे, तसेच सन २०२६-२७ साठी वैधानिक लेखापरीक्षणाकरिता नवीन लेखापरीक्षक नियुक्त करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे, या विषयांवर सभेत सविस्तर चर्चा झाली.

अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित करण्यात आलेल्या विविध विषयांवर सभासदांनी सहभाग घेत चर्चा केली. सभासदांच्या प्रश्नांना संचालक मंडळाकडून समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

यावेळी संस्थेचे चेअरमन कोंडाजी उगले, व्हाईस चेअरमन सौ. कुसुम उगले, संचालक नानासाहेब उगले, चंद्रभान उगले, अनिल उगले, बंडू उगले, उत्तम उगले, निवृत्ती सरोदे, अशोक उगले, सौ. मंदा उगले, दयानंद चिकणे, लक्ष्मण पवार, सचिव बाळासाहेब मोरे, कॉम्प्युटर ऑपरेटर नवनाथ



उगले आदी उपस्थित होते.

तसेच विठ्ठलभाऊ उगले, सरपंच दशरथ उगले, माजी सरपंच बाबासाहेब उगले, उपसरपंच अमोल उगले, एकनाथ गोर्डे, सुनील उगले, ज्ञानेश्वर उगले, सूर्यभान उगले, हरिभाऊ हांडे, गणेश उगले, राधाकिसन उगले, हरिभाऊ उगले, रमेश उगले, आण्णासाहेब उगले, रावसाहेब उगले, किशोर उगले, विजय उगले, राजेंद्र उगले, अशोक नेहरकर, निवृत्ती पानसरे, संदीप उगले, चंद्रभान उगले, संतोष उगले, योगेश उगले, अमोल उगले आदींसह संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निराधारांच्या प्रकरणांना 'कार्यालयीन फेऱ्यांचा' फास नको...!

## पात्र लाभार्थ्यांना तातडीने लाभ देण्याची मागणी; आ. काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक





**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

संजय गांधी निराधार योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना शासकीय कार्यालयांच्या विनाकारण फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच प्रलंबित प्रकरणांचा नियमानुसार तातडीने निपटारा करावा, अशी मागणी समितीचे सदस्य पंढरीनाथ उंडे यांनी केली. तहसील कार्यालय, पारनेर येथे गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी समितीचे अध्यक्ष तथा आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सामाजिक सुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत संजय गांधी निराधार योजना व इतर सामाजिक सुरक्षा योजनांशी संबंधित प्रकरणे, पात्र लाभार्थी आणि प्रलंबित अर्जांबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. गरजू आणि वंचित घटकांना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यावर चर्चा झाली.

'लाभार्थ्यांना विनाकारण झुलवत ठेवू नका'

यावेळी बोलताना पंढरीनाथ उंडे म्हणाले, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभासाठी येणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना कार्यालयीन प्रक्रियेत विनाकारण झुलवत ठेवता कामा नये. त्यांची प्रकरणे नियमानुसार तातडीने निकाली काढण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. पात्र व्यक्तींना आपल्या हक्काच्या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत.

पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांची नियमानुसार तपासणी करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी समिती आणि प्रशासनामध्ये समन्वय राखण्यावर भर देण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार आकाश किसवे, समितीचे सदस्य पंढरीनाथ उंडे, सुधामती कवाद, रवींद्र आहेर, रमेश गाडगे, तुकाराम खाडे, अनिल वाबळे, तालुका समन्वयक शुभांगी औटी, सहाय्यक महसूल अधिकारी अलका कंद, अर्चना जगताप यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## महिला वॉशरूममध्ये शिरून विवाहितेवर अत्याचार ; नगर शहरातील घटना

अहिल्यानगर (स.गांवकरी) (समर्थ गांवकरी)

उपनगरातील एका कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस असलेल्या महिला वॉशरूममध्ये शिरून एका विवाहित महिलेवर अत्याचार केल्याची घटना मंगळवारी (१५ सप्टेंबर) रात्री घडली. याप्रकरणी पीडित महिलेने (वय २२) बुधवारी (१६ सप्टेंबर) पहाटे दिलेल्या फिर्यादीवरून देविदास खराद (रा. शनिधाम रोड, भारत बेकरीच्या मागे, बोल्हेगाव) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या कुटुंबाचा कपड्यांचा व्यवसाय असून उपनगरातील कॉम्प्लेक्समध्ये महिलांच्या कपड्यांचे दुकान आहे. दुकानाच्या मागील बाजूस महिला व पुरूषांसाठी स्वतंत्र वॉशरूमची व्यवस्था आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, मंगळवारी रात्री पावणे नऊच्या सुमारास महिला तिच्या सासूसोबत कपड्यांच्या दुकानात काम करीत होती. यावेळी ती कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस असलेल्या महिला वॉशरूममध्ये गेली. वॉशरूममध्ये प्रवेश करून दरवाजा बंद करीत असतानाच देविदास खराद याने दरवाजा ढकलून आत प्रवेश केल्याचे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे.

त्यानंतर त्याने वॉशरूमचा दरवाजा आतून बंद करून महिलेचे तोंड दाबले आणि जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या घटनेनंतर काही वेळाने महिलेचा पती व दीर तेथे आले. त्यांनी वॉशरूमचा दरवाजा तोडला. दरवाजा तुटल्यानंतर संशयित तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला पकडले. मात्र, हाताला झटका देऊन संशयित पळून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## गौराईचे उत्साहात आगमन ; महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरात गणेशोत्सवाच्या उत्साहात गुरुवारी (ता. १७) विविध ठिकाणी गौराईचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. घराघरांत महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौराईचे स्वागत करून पूजा–अर्चा केली. गौराईच्या आगमनानिमित्त घरांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.गौराईच्या स्वागतासाठी महिलांनी सकाळपासूनच घरांची स्वच्छता करून विविध प्रकारच्या रांगोळ्या काढल्या. फुलांच्या माळा, तोरणे तसेच आकर्षक विद्युत रोषणाईने घरांचा परिसर सजविण्यात आला.



गौराईला साडी, दागिने व पारंपरिक अलंकारांनी सजवून तिची विधिवत पूजा करण्यात आली.गौराईच्या आगमनामुळे परिसरातील वातावरण भक्तिमय झाले असून महिला व मुलींमध्ये विशेष उत्साह दिसून आला. अनेक कुटुंबांमध्ये पाहुण्यांचे आगमन झाले असून गौराईच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने नैवेद्य व विविध पदार्थ तयार करण्यात आले आहेत.गौराईच्या पूजनानंतर महिलांनी एकमेकींना हळदी–कुंकू लावून शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवाबरोबरच गौराईच्या आगमनामुळे परिसरातील सणाचा उत्साह आणखी वाढला आहे.

हारांचे दर तीन ते साडेतीनपट

गौरी पूजनाचा मुख्य दिवस आणि त्यानंतरचे विधी असल्याने उद्या (शुक्रवारी) सकाळीही गौरी पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी राहण्याची शक्यता आहे. गौरींच्या हारांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने त्यांच्या दरात वाढ झाली आहे. एरव्ही ३० रुपयांना मिळणारा हार गुरुवारपासून १०० ते १२० रुपयांना विकला जात होता. त्यामुळे गौरी पूजेच्या साहित्याच्या खर्चात वाढ झाली.



नगर शहरातील झारेकर गल्ली येथील मृत्यूंजय मित्र मंडळ(हनुमान व्यायाम शाळा)यांची भव्य अकरा फुटी श्री गणेश मूर्ती व महाभारत ग्रंथ शहराचे आकर्षण ठरले आहे.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात तालुकास्तरीय तायकंदो व मैदानी स्पर्धांचा शुभारंभ; तायकंदोमध्ये ७ खेळाडूंना सुवर्णपदक

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शालेय तालुकास्तरीय तायकंदो व मैदानी स्पर्धांचा उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त मा. सुभाषकाका शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना मा. सुभाषकाका शिंदे यांनी क्रीडा प्रकारांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. खेळाडूंनी क्रीडांगणावर नेहमी शिस्त व क्रीडाभावना जपत प्राविण्य मिळवावे आणि मैदानी खेळांच्या माध्यमातून आपले आरोग्य निरोगी ठेवावे, असे आवाहन त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

तत्पूर्वी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी सर्व पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत करून स्पर्धांच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि त्यांच्यातील सुप्त गुण फुलतात, असे सांगत त्यांनी महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेचा आढावा घेतला व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त प्रा सुरेश रसाळ, डॉ धर्मनाथ काकडे तायकंदो खेळाचे जिल्हा अध्यक्ष संजय आनंदकर सर तसेच श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार सर आदी मान्यवर उपस्थित होते.

दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या या तालुकास्तरीय तायकंदो स्पर्धेत महाविद्यालयातील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करत नीरज राजेंद्र जैन, अमरजीत प्रवीण बळे, अंतरा बाबासाहेब बळे, सृष्टी सोपान कोथिंबिरे, गायत्री सतीश भुजबळ, शर्वरी सूर्यभान गोलांडे आणि सिया सतीश कोकणे या ७ खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावून आगामी जिल्हास्तरीय शालेय तायकंदो स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा नागवडे, सौ. अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिन लगड सर, सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उपप्राचार्य कातोरे सर तसेच पर्यवेक्षक टकले सर यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या यशस्वी खेळाडूंना डॉ. सतीश चोरमले व डॉ. महेश गिरमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेत अशाच प्रकारची दमदार कामगिरी करत महाविद्यालयाचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले.

## वाहनांची वर्दळ वाढल्याने नेवासाफाटा ते नेवासा रस्त्यावर गतिरोधक बसवा-शिवसेनेचे मुन्ना चक्रनारायण यांची मागणी

नेवासा (समर्थ गांवकरी)

दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ वाढत चालल्याने अपघाताचे प्रमाण ही वाढत असल्याने नेवासाफाटा ते नेवासा या मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेवासा तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून याबाबत कार्यवाही न झाल्यास या भागातील शालेय विद्यार्थी व रहिवाशांना बरोबर घेऊन रास्तारोको आंदोलन करण्याचा ईशारा त्यांनी दिला आहे

नेवासा ते नेवासाफाटा या मुख्य रस्त्यावर गांधीनगर, गायत्रीनगर,नामदेवनगर,श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय व त्यांच्या शेजारीच ज्ञानदीप इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर, संभाजीनगर ही उपनगरे ही येतात या उपनगरामधील रहिवाशांना तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या नेवासा

शहरात व तेथील लोकांना नेवासाफाटा येथे सतत कामानिमित्त यावे लागते मात्र या भागात स्पीड बेकर्स नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावतात त्यामुळे अनेक प्रकारचे अपघात या रस्त्यावर घडलेले आहे.

या रस्त्यावर असलेल्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात दररोज हजारो विद्यार्थी तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून येथे शिक्षण घेण्यासाठी येत असतात,महाविद्यालयात सकाळच्या सत्रातील कॉलेज सुटतांना व दुपारच्या सत्रातील ज्युनियर कॉलेज भरतांना विद्यार्थ्यांची खुपच गर्दी होत असते त्याच बरोबर गायत्रीनगर प्रवेशद्वाराजवळ मुलींचे शासकीय वसतिगृह व येथील भागातील रहिवासी हे ये जा करत असतात येथे ही गतिरोधक बसविणे गरजेचे आहे असे निदर्शनास आले आहे.



याच रस्त्यावर अहिल्यानगर व गांधीनगर प्रभाग असून येथे ही गतिरोधकाची गरज असून या रस्त्यावर अतिशय वेगाने वाहने धावत असतात.

वाहनाच्या वेगावर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांना व नागरीकांना त्रास सहन करावा लागतो गेल्या काही दिवसांत या लहान मोठे अपघांत घडले असून भविष्यांत मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, विद्यार्थ्यांच्या आणी पादचा-याच्या सुरक्षतेच्या दृष्टीने या ठिकाणी वाहनाचा वेग कमी करणे अत्यंत आवश्यक असल्याने या भागात गतिरोधक बसविणे हाच त्यावर उपाय आहे परिस्थतीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर तसेच उपनगरातील रस्त्यावर लवकरात लवकर योग्य आकाराचे गतिरोधक बसवावेत तसेच या रस्त्यावर वाहतुक नियमांचे फलक बसविण्यांत यावेत सदरचे काम आठ दिवसाच्या आत न झाल्यास या परिसरातील नागरिक व शालेय विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन नेवासा कॉलेज रस्त्यावर रास्तारोको आंदोलन केले जाईल असा ईशारा शिवसेना तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण यांनी निवेदनात दिला आहे

## तायक्कांदोच्या रिंगमध्ये पोद्दारच्या 'दुर्गाशक्ती'ची रौप्य झेप!

### तालुकास्तरीय तायक्कांदोत वेदश्री ढवळे व दिव्यांशी ननवरे यांची दमदार कामगिरी; वुशूतही मिळवले पदकांचे यश

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पोद्दार लर्न स्कूलच्या कु. वेदश्री ढवळे आणि कु. दिव्यांशी ननवरे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदकांची कमाई केली. याशिवाय जामखेड येथे झालेल्या वुशू स्पर्धेतही वेदश्रीने कांस्य, तर दिव्यांशीने रौप्य पदक पटकावत दुहेरी यशाची नोंद केली. आयडियल स्पोर्ट अकॅडमीच्या या दोन्ही खेळाडूंनी तायक्कांदोच्या विविध लढतींमध्ये चपळाई, आत्मविश्वास, आक्रमक खेळ आणि तांत्रिक कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पोद्दार लर्न स्कूलसह श्रीगोंद्याच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.स




या यशामागे दोन्ही खेळाडूंची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि आयडियल स्पोर्ट अकॅडमीचे सर्वेसर्वा तसेच पोद्दार लर्न स्कूलचे क्रीडा शिक्षक बाबू बळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगतीची संधी मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

वेदश्री आणि दिव्यांशी यांच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य आनंद शहा, चेअरमन नवनीत मुनोत, गौरव मुनोत, राहुल कोठारी, अतुल बगाडे, अमित बगाडे, हितेश मुथा, योगेश मुथा, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक, आयडियल स्पोर्ट अकॅडमीचे पदाधिकारी तसेच क्रीडाप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले. तायक्कांदोसारख्या स्वसंरक्षणप्रधान खेळामुळे मुलींमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि संकटांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होत असून, वेदश्री आणि दिव्यांशी यांची ही यशस्वी वाटचाल इतर विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## नेवासा येथील कांदा बाजारात तेजी; कमाल भाव ५ हजार रुपये,१४५ वाहनांची आवक-सभापती नंदकुमार पाटील

नेवासा (समर्थ गांवकरी)

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक चित्र निर्माण झाले असून, नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा बाजारात गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) कांद्याला चांगला भाव मिळाला. बाजारात एकूण १४५ वाहनांची आवक झाली. यावेळी कांद्याला कमाल ५ हजार रुपये, सरासरी ४ हजार २५० रुपये तर किमान १ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याची माहिती सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली.



बाजार समितीतील लिलावात ४५०० ते ५००० रुपये दराच्या श्रेणीत ११ वाहने, ४००० ते ४५०० रुपये दरात ६० वाहने, ३५०० ते ४००० रुपये दरात ३७ वाहने, ३००० ते ३५०० रुपये दरात ९ वाहने, २५०० ते ३००० रुपये दरात १८ वाहने, तर १५०० ते २५०० रुपये दरात १० वाहनांची आवक झाली.बाजार समितीमध्ये लिलाव झालेल्या सर्व वाहनांना सरासरी ४२५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. यामध्ये बद्दा, गोट्टी, गोल्टा व सुपर मालाचा समावेश असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे. कांद्याच्या बाजारभावात समाधानकारक स्थिती असल्याने परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या दूरदृष्टीमुळे नेवासा शहराच्या परिसराला देखील बाजारपेठेच्या दृष्टीने महत्व प्राप्त झाले असून नेवासा बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ,सचिव व कर्मचारी वृंद यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली नेवासा कांदा मार्केटला दिवसेंदिवस बहर आलेला दिसत असून कांद्याला चांगला भाव ही निघत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत असल्याचे बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले

## अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांना प्रवेशास परवानगी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

■ खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश

■ २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

अहिल्यानगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली आहे.

या महाविद्यालयाच्या मान्यतेसह विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी खासदार डॉ. नीलेश लंके यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने १६ सप्टेंबर रोजी शासन निर्णय काढून प्रवेशास मान्यता दिली आहे.अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच त्यास संलग्न ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास यापूर्वी केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर परवानगी देण्यात आली होती. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्षाच्या १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची परवानगी प्रलंबित होती. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगानेही प्रथम अपील फेटाळले होते.दरम्यान, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयास २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षात १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास परवानगी देण्यात आली. त्यानंतर राज्य शासनानेही याबाबत शासन निर्णय जारी केला. या निर्णयानुसार महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १०० विद्यार्थ्यांची राहणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व मानके आणि प्रवेशाची निर्धारित कार्यपद्धती यांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. ही परवानगी २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी असून, पुढील शैक्षणिक वर्षांत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून परवानगीचे नूतनीकरण करून घेणे आवश्यक राहणार आहे.



मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, असेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. महाविद्यालयासोबत ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय असल्याने वैद्यकीय शिक्षणासोबतच आरोग्यसेवेच्या सुविधांनाही यामुळे चालना मिळणार आहे.

## पवनचक्की पाहायला गेलेल्या युवतीवर नगर तालुक्यात सामुहिक अत्याचार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पवनचक्की पाहण्यासाठी मानलेल्या भावासोबत देवगाव (ता. अहिल्यानगर) परिसरात गेलेल्या युवतीला दोन तरूणांनी दुचाकीवरून निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर सामुहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेत युवतीच्या सोबत असलेल्या युवकालाही दोघांनी मारहाण केली.

दरम्यान, घटनास्थळी आलेल्या दोन तरूणांनी पीडित युवतीची व तिच्या मानलेल्या भावाची सुटका केली. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरूध्द बुधवारी (१६ सप्टेंबर) पहाटे गुन्हा दाखल केला आहे. पीडित युवतीने (वय २२) फिर्याद दिली आहे. फिर्यादी युवती अहिल्यानगर शहरात खासगी नोकरी करते. ती शहरातील सावेडी परिसरात भाड्याच्या खोलीत राहते. तिच्यासोबत काम करणारा २० वर्षीय युवक हा तिचा मानलेला भाऊ असून तो नाशिकचा असल्याचे तिने फिर्यादीत नमूद केले आहे.

फिर्यादीनुसार, मंगळवारी (१५ सप्टेंबर) सायंकाळी ड्यूटीवरून सुटल्यानंतर फिर्यादी व तिचा मानलेला भाऊ दुचाकीवरून देवगाव परिसरात पवनचक्की पाहण्यासाठी गेले होते. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ते देवदरी हॉटेलसमोरील एका पवनचक्कीजवळ गेले.

तेथे ते पवनचक्की पाहत असताना सायंकाळी सातच्या सुमारास दुचाकीवरून दोन तरूण तेथे आले. त्यांनी त्या ठिकाणी येण्याबाबत विचारणा करून युवती व तिच्या सोबतच्या युवकाला शिवीगाळ केले. त्यानंतर एका तरूणाने युवतीला त्यांच्या दुचाकीवर बसण्यास सांगितले. तिने नकार दिल्यानंतर तिच्या सोबतच्या




युवकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर युवतीला जबरदस्तीने दुचाकीवर बसविण्यात आले, तर दुसर्या तरूणाने तिच्या सोबतच्या युवकाला त्याच्या दुचाकीवर बसवून घेतले.

दोन्ही दुचाकी अहिल्यानगर रोडने घाटाच्या दिशेने नेण्यात आल्या. त्यानंतर मच्छिंद्रनाथाच्या कमानीतून कच्च्या रस्त्याने निर्जन भागात नेण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तेथे युवतीने त्यांना आपण काय चूक केली, असे विचारून सोडून देण्याची विनंती केली. मात्र, तिच्या सोबतच्या युवकानेही त्यांना सोडण्याची विनंती केली असता त्याला पुन्हा मारहाण केली. दोघांचे मोबाईल हिसकावून घेतले. तसेच दोघांनी तिला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. पीडिता व तिच्यासोबतचा युवक आरडाओरड करत असताना तेथे एक तरूण आला. त्याने दोघांना असे कृत्य करू नका, असे सांगितले. मात्र, संशयितांनी त्यालाही तेथून जाण्यास सांगितले.

काही वेळाने तो तरूण आणखी एका साथीदारासह पुन्हा घटनास्थळी आला. त्यांनी पीडित युवती व तिच्या सोबतच्या युवकाची सुटका केली. त्यानंतर संशयित दोघे मोबाईल परत देऊन दुचाकीवरून तेथून पसार झाले. मदतीला आलेल्या तरूणांनी पीडितेला धीर देत पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी पीडित युवतीला धीर देत फिर्याद नोंदवून घेतली. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे अधिक तपास करीत आहेत.

संशयित दोघे गजाआड

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर अहिल्यानगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकार्यांना माहिती देण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी संशयित आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखा व तालुका पोलिसांनी शोध मोहिम राबवित संशयित दोघांना ताब्यात घेतले. संदेश गोरक्षनाथ शिंदे आणि मोहित अशोक खळे (दोघे रा. देवगाव) अशी त्यांची नावे आहेत. त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयाने पाच दिवसांची (२१ सप्टेंबरपर्यंत) पोलीस कोठडी दिली आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## महामार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

मंचर (समर्थ गांवकरी)

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर आंबेगाव तालुक्यातील गायमुख-तांबडेमळा चौकाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत अडीच वर्षांच्या नर बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. १६) सकाळी उघडकीस आली. पहाटे तीन ते चारच्या दरम्यान हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे.

तांबडेमळा येथील शिवाजी तांबडे हे सकाळी आठच्या सुमारास मंचरच्या दिशेने जात असताना महामार्गाच्या डाव्या बाजूला कडेला बिबट्या मृतावस्थेत पडलेला दिसला. त्यांनी तत्काळ वनविभागाला घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच मंचरचे वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केल्यानंतर मृत बिबट्याला शासकीय वाहनातून अवसरी घाट येथे नेण्यात आले. अवसरी खुर्द येथील श्रेणी-१ पशुवैद्यकीय अधिकारी वसंतराव वाळूंज यांनी शवविच्छेदन केले. त्यानंतर वनविभागाच्या नियमानुसार बिबट्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या घटनेप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, वनविभागाकडून तपास सुरू आहे. महामार्गालगत बिबट्यांची वर्दळ असलेल्या परिसरात वाहनांचा वेग नियंत्रित राहावा, यासाठी सूचना फलक लावावेत, अशी मागणी काळभैरवनाथ पतसंस्थेचे अध्यक्ष आणि उद्योजक भरत भोर यांनी केली आहे.

## गौराईचे उत्साहात आगमन
## महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरात गणेशोत्सवाच्या उत्साहात गुरुवारी (ता. १७) विविध ठिकाणी गौराईचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. घराघरांत महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौराईचे स्वागत करून पूजा-अर्चा केली. गौराईच्या आगमनानिमित्त घरांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.



गौराईच्या स्वागतासाठी महिलांनी सकाळपासूनच घरांची स्वच्छता करून विविध प्रकारच्या रांगोळ्या काढल्या. फुलांच्या माळा, तोरणे तसेच आकर्षक विद्युत रोषणाईने घरांचा परिसर सजविण्यात आला. गौराईला साडी, दागिने व पारंपरिक अलंकारांनी सजवून तिची विधिवत पूजा करण्यात आली.

गौराईच्या आगमनामुळे परिसरातील वातावरण भक्तिमय झाले असून महिला व मुलींमध्ये विशेष उत्साह दिसून आला. अनेक कुटुंबांमध्ये पाहुण्यांचे आगमन झाले असून गौराईच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने नैवेद्य व विविध पदार्थ तयार करण्यात आले आहेत.

गौराईच्या पूजनानंतर महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवाबरोबरच गौराईच्या आगमनामुळे परिसरातील सणाचा उत्साह आणखी वाढला आहे.

हारांचे दर तीन ते साडेतीनपट

गौरी पूजनाचा मुख्य दिवस आणि त्यानंतरचे विधी असल्याने उद्या (शुक्रवारी) सकाळीही गौरी पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी राहण्याची शक्यता आहे. गौरींच्या हारांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने त्यांच्या दरात वाढ झाली आहे. एरव्ही ३० रुपयांना मिळणारा हार गुरुवारपासून १०० ते १२० रुपयांना विकला जात होता. त्यामुळे गौरी पूजेच्या साहित्याच्या खर्चात वाढ झाली.

## प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे अभिवादन



मुंबई (समर्थ गांवकरी)

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी दत्तात्रय शिंदे, प्रदीप कोभार्डे ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण यांनीही प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पेमराज सारडा महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक दिवसीय जिल्हास्तरीय राज्यस्तरीय व राष्ट्रीय प्रजासत्ताक पूर्व संचलन निवड चाचणी शिबिर संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे आणि पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रजासत्ताक पूर्व संचलन व राष्ट्रीय प्रजसत्ताक पूर्व संचलन निवड शिबिर' या एक दिवसीय जिल्हास्तरीय शिबिर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले.

शिबिराची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.उद्घाटन सत्रात प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी शिबिरार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.महात्मा गांधींचा 'खेड्याकडे चला' हा संदेश अवलंबण्यासाठी आपल्या कार्याची सुरुवात खेड्यामधूनच झाली पाहीजे. असे नमूद केले.

भारताचा आत्मा हा खेड्यामध्येच आहे.तसेच देशाच्या विकासामध्ये तरुणांचा सहभाग महत्वाचा आहे व युवकांमधील सुप्तगुण हे शिबिरामध्येच हेरले जातात. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे केवळ समाजसेवेचा उपक्रम नाही, तर युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची एक प्रभावी चळवळ आहे. छीं चश ईीं र्धी मी नव्हे, तू हा छड्ड चा विचार स्वयंसेवकाला स्वतः च्या पलीकडे जाऊन समाज,राष्ट्र आणि मानवतेचा विचार करायला शिकवतो.

प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होणे ही प्रत्येक छड्ड स्वयंसेवकासाठी अत्यंत प्रतिष्ठेची आणि अभिमानाची संधी आहे. कर्तव्यपथावर देशाच्या प्रथम नागरिकांना मानवंदना देण्याचा क्षण हा केवळ एका स्वयंसेवकाचा सन्मान नसतो;त्या क्षणी त्याच्या कुटुंबाचा, महाविद्यालयाचा, विद्यापीठाचा आणि संपूर्ण छड्ड परिवाराचा सन्मान होत असतो.असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे उपस्थित होते.त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व व प्रजासत्ताक पूर्व संचलन व राष्ट्रीय प्रजासत्ताक पूर्व संचलन निवड चाचणी संदर्भात स्वयंसेवकांना नियमावली व विस्तृतपणे मार्गदर्शन केले.

या शिबिरास प्रा.डॉ.प्रकाश गावित,कॅप्टन रविंद्र चोभे, प्रा.धनंजय लाटे, प्रा. डॉ. किरणकुमार साळवे व डॉ. श्याम शिंदे हे परीक्षक लाभले.या शिबिरासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून विविध महाविद्यालयातील एकूण ४० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.



निवड चाचणीसाठी स्वयंसेवकांनी पंधराशे मीटर धावणे, परेड घेणे, मुलाखत, इ.विविध परीक्षांमध्ये आपले कौशल्य पणाला लावले. परीक्षकांनी तटस्थपणे व निपक्षपातीपणे नियामानुसार ८ विद्यार्थिनी व ८ विद्यार्थी असे १६ स्वयंसेवकांची निवड करून विद्यापीठ्स्तरावर निवडीस पाठवले.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.राजेंद्र देशमुख,प्रा.माधुरी दीक्षित,राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे,विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.डॉ. किरणकुमार साळवे,प्रा.साक्षी बनसोडे,प्रा. आरती गोसावी व कमवा व शिका मधील विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. या उद्घाटन शिबिराचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.माधुरी दीक्षित यांनी केले.तर आभारप्रदर्शन प्रा.राजेंद्र देशमुख यांनी केले.

# सर्वोदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कुस्ती स्पर्धांत तालुकास्तरावर गुरुड झेप

## अहिल्यानगर जिल्हा स्पर्धांसाठी निवड

राजूर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर क्रीडा कार्यालय व अकोले तालुका क्रीडा समिती अकोले व सर्वोदय विद्यामंदिर राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालय राजूर येथील साई कुस्ती केंद्रात पार पडल्या.

या कुस्ती स्पर्धांत सत्यनिकेत संस्थेचे गुरुवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या एकूण २३ विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादित करत गरूड झेप घेतली.

१४ वर्षे मुलांच्या वयोगटात प्रणव प्रकाश पाटील (३५ किलो), जय जगदिश चौधरी (४१ किलो ), मयुरेश पंकज लहामगे (४४ किलो), योगेश गजानन चौधरी (५७ किलो),अनिकेत प्रकाश देशमुख(६२ किलो) यांनी प्रथम क्रमांक तर करण प्रकाश साळुंके (४४ किलो) याने द्वितीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षे मुलांच्या वयोगटात सुयोग संदिप देठे (४८ किलो), सार्थक बाळासाहेब चौधरी (५१ किलो), सार्थक बाळू सदगिर(५५ किलो), साईराज अशोक येलमामे (६० किलो), ग्रिकोमध्ये करण रविंद्र देशमुख (४५ किलो), कृष्णा लक्ष्मण डोके (४८ किलो), धनराज हरी धनगर(५५ किलो ) यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

१९ वर्षे मुलांच्या वयोगटात जयेश गणेश बोऱ्हाडे (५७ किलो), सुरज संजय मुतर्डक (६१ किलो),अधिराज राधाकिसन देशमुख (६५ किलो), ऋतिक मानकू भोईर (७० किलो), युवराज जालिंदर येलमामे (७४ किलो),मयूर खंडू मेंगाळ (७९ किलो), राहूल दिगंबर सोनूले(८६ किलो), ग्रिकोमध्ये सुयोग प्रविण साठे (५५ किलो), निलेश गणपत



लोहरे (६० किलो),करण काळू देशमुख (६३ किलो), तर मुलींच्या गटात ईश्वरी पोपट जाधव( ५० किलो ) आदिंनी प्रथम क्रमांक मिळविला.या खेळाडूंची जिल्हा स्तरासाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेचे उदघाटन सत्यनिकेतन संस्थेचे जेष्ठ संचालक विजयजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी प्राचार्य भाऊसाहेब बनकर,उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे,पर्यवेक्षक संजय व्यवहारे,तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष योगेश उगले प्राचार्य डॉ.बी.वाय. देशमूख , संस्थेचे शिक्षण निरिक्षक लहानू पर्बत,सदाशिव गिरी , किशोरजी देशमूख ,अनिल पवार,राष्ट्रीय कुस्ती पंच तान्हाजी नरके,प्रा. विकास नवले,तसेच तालुक्यातील विदयालयातील क्रीडा शिक्षक, पालक उपस्थित होते

या स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडा शिक्षक जालिंदर आरोटे, विनोद तारू यांनी नियोजन केले. प्रास्ताविक प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी केले.संतराम बारवकर यांनी सूत्र संचालन केले. तर मच्छिंद्र देशमुख यांनी आभार मानले.

या नेत्रदिपक कामगिरीमुळे संस्थेचे अध्यक्ष ॲड.मनोहरराव देशमुख,सचिव एम.एल. मुठे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन,सर्व संचालक,प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदिंनी अभिनंदन केले.

# गणेशोत्सवात अखंड वीजपुरवठा द्या

## खासदार नीलेश लंके यांचे ऊर्जा विभागाला निर्देश
## सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत भारनियमन टाळण्याची मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण तसेच शहरी भागात नागरिकांना अखंड, सुरळीत आणि योग्य दाबाने वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाकडे केली आहे. याबाबत त्यांनी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने स्पष्ट निर्देश देण्याची मागणी केली आहे.



गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून शहरांबरोबरच ग्रामीण भागातील गावठाणे, वाड्या-वस्त्यांमध्येही विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळच्या वेळेत नागरिक मोठ्या संख्येने आरती व अन्य कार्यक्रमांसाठी एकत्र येतात. अशा वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांची गैरसोय होत असल्याचे खासदार लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील विविध भागांत वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीजपुरवठा होणे, भारनियमन करणे तसेच सिंगल फेज बंद होणे, अशा तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. काही ठिकाणी वीज उपलब्ध असतानाही 'वरून वीजपुरवठा बंद करण्याचे आदेश आहेत', असे कारण सांगितले जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. गणेशोत्सवाच्या उर्वरित कालावधीत विशेषतः सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत अनावश्यक भारनियमन अथवा वीजपुरवठा खंडित करू नये.

# श्री ढोकेश्वर विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी राजभाषा हिंदीचा प्रसार करावा : प्राचार्य बाळासाहेब खिलारी

ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)

हिंदी भारत देशाची राजभाषा आहे. विद्यार्थ्यांनी मातृभाषा मराठी इतकेच हिंदी भाषेविषयी जागरूक रहावे. भारत हा विविधतेतून एकदा जपणारा देश आहे. हिंदी भाषेच्या ज्ञानामुळे आपणास जागतिक स्पर्धेत टिकून राहता येईल. विद्यार्थ्यांनी राजभाषा हिंदीचा प्रसार करावा. असे प्राचार्य श्री. खिलारी यांनी १४ सप्टेंबर या हिंदी दिवस कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून सांगितले.

श्री ढोकेश्वर विद्यालयात, १४ सप्टेंबर हा हिंदी दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस हिंदी भाषेचे थोर साहित्यकार मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या साहित्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब निवडुंगे यांनी आपल्या भाषणातून सर्वांना हिंदी दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी हिंदी भाषा आत्मसात करावी. कोणताही न्यूनगंड न बाळगता हिंदी भाषेचा वापर करावा. श्रीम.




सुमन वाळुंज मॅडम यांनीही आपल्या भाषणातून हिंदी भाषेचा विकास व महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

या कार्यक्रमात फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविलेल्या इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. बक्षीस वितरणाचे वाचन हिंदी विषय शिक्षिका श्रीम. प्रिया डव्हणे मॅडम यांनी केले. याच कार्यक्रमात संस्थेच्या जिल्हास्तरीय ज्ञानवर्धिनी स्पर्धेत उज्वल यश मिळवलेल्या कु. वैभवी सुमित कटारिया व आराध्या अमित कडुसकर यांचाही विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

हिंदी दिनाच्या निमित्ताने विद्यालयात वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व सुंदर हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधून वेद दाते, वैष्णवी ठुबे, भक्ती खैरे, समृद्धी जांभळकर, ज्ञानेश्वरी उदावंत, वेदिका वाळुंज, प्रियल झावरे, मनस्वी झावरे यांनी हिंदी भाषेविषयी अतिशय सुंदर विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानदा पायमोडे हिने केले. अध्यक्ष निवड कुणाल गायकवाडने केली. अनुमोदन कारुण्या आल्हाटने दिले. सूत्रसंचालन वैभवी कटारिया व आराध्या कडुसकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन समृद्धी जांभळकर हिने केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सांस्कृतिक समिती, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर सेवकांनी खूप परिश्रम घेतले.

# पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यात पुण्याच्या चोरडिया बंधूंची चौकशी....!

## काळा पैसा पांढरा केल्याचा आरोप

पारनेर (समर्थ गांवकरी)

देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री घोटाळ्यातील गुन्ह्यातील नऊ आरोपींच्या बँक खात्यांवर सुमारे तेवीस कोटी रुपये पाठवणारे पुण्याचे अतुल चोरडीया व अशोक चोरडिया या बड्या उद्योजक बंधूंची पारनेर पोलिसांकडून चौकशी होणार आहे. पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि तपासी अधिकारी सोमनाथ दिवटे यांनी चोरडीया बंधुंना तपासाकामी पारनेर पोलीस ठाण्यात उपस्थित राहण्याच्या नोटीस बजावल्या आहेत.

जुन महीण्यात या गुन्ह्याचा तपास पारनेर न्यायालयाच्या निगराणीत गेल्याचा आदेश झाल्यानंतर थंडावलेल्या तपासाने पुन्हा एकदा गती घेतली आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की,

पारनेर साखर कारखाना राज्य सहकारी बॅकेकडून लिलावात खरेदी करीता चोरडिया बंधूंनी पुण्याचे माजी खासदार विदुरा नवले यांच्या कुटुंबातील सदस्य नऊ आरोपींच्या खात्यात सुमारे तेवीस कोटी रुपये रकमा पाठवल्या आहेत, या रकमा आरोपींनी त्यांच्या क्रांती शुगर कंपनीत न गुंतवता थेट महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला



परस्पर पाठवल्या होत्या व त्या बदल्यात क्रांती शुगर कंपनी करिता साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केली होती. केवळ कागदोपत्री अस्तित्व असलेल्या क्रांती शुगर कंपनीने कोट्यावधी रुपयांच्या रकमेचा पारनेर सहकारी साखर कारखाना कसा खरेदी केला याबाबत आक्षेप घेऊन कारखाना बचाव समितीने गुन्हा दाखल केला आहे. कारखाना बचाव समितीचा आरोप आहे की, चोरडिया बंधुंनी गुंतवलेला हा सर्व कर चुकवलेला पैसा (काळा पैसा ) असून, आरोपींनी त्यातून मालमत्ता खरेदी

केल्याचे दाखवून पुन्हा त्याच मालमत्तेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने आरोपींना सुमारे ३४० कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. अशाप्रकारे आरोपींनी काळा पैसा पांढरा केला आहे.

# तातडीच्या उपचारांनी उपकोषागार अधिकाऱ्याला जीवदान

## मंचर उपजिल्हा रुग्णालयातील पथकाचे यश

मंचर (समर्थ गांवकरी)

तहसीलदार निवासस्थान, घोडेगाव येथे राहणारे उपकोषागार अधिकारी विजय अनंत दांगट (वय ५५) यांना गुरुवार दिनांक १७ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास अचानक छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यांना तातडीने घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीनंतर हृदयविकाराचा झटका आल्याचे निदान झाले. तातडीच्या वैद्यकीय प्राथमिक उपचारामुळे त्यांना जीवदान मिळाले आहे.

ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मंचर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधून दांगट यांना रुग्णवाहिकेतून तातडीने पुढील उपचारासाठी पाठविले. रुग्णालयातील पथकाने पूर्वतयारी केल्याने रुग्ण दाखल होताच अतिदक्षता विभागात उपचार सुरू करण्यात आले. हृदयातील रक्तप्रवाह पूर्ववत करण्यासाठी स्ट्रेप्टोकिनेज हे औषध देण्यात आले. यावेळी मंचर येथील हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित बोचरे हेही तातडीने रुग्णालयात दाखल झाले. औषधोपचारादरम्यान दांगट यांचा रक्तदाब कमी झाला. डॉ. बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदाब वाढविण्यासाठी औषधोपचार सुरू करून तो पूर्ववत करण्यात आला. उपचारानंतर छातीतील वेदना पूर्णपणे थांबल्या असून रक्तदाब, नाडीचे ठोके व प्राणवायूचे प्रमाण सामान्य झाले. डॉ. अभिजित बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली थ्रोम्बोलिसिस केंद्राचे नोडल अधिकारी डॉ. रामप्रसाद धायकर, डॉ. अर्जुन दिघे, तळेघर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राहुल जोशी, डॉ. साहिल टाके, अंजली इंदोरे, परिचारिका वॉर्ड सहायक प्रज्वल नेहरकर आणि योगेश वाडेकर यांनी उपचार केले. पुढील उपचारासाठी दांगट यांना हृदयाची रक्तवाहिनी तपासणी



(अँजिओग्राफी) करण्यासाठी पाठविण्यात आले.